

SBI PEN. ASSN.'S SAMVAD
स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे यांची गृहपत्रिका
Price ₹ 3/-
संवाद
VOL : 10
ISSUE : 4
OCTOBER : 2017
ऑक्टोबर : २०१७
PAGES : 28
मनामनांचा मेळ जुळावा । द्वेषाचा लवलेश नसावा ।।
सादासी प्रतिसाद मिळावा । वाद नको संवाद असावा ।।
1



(from Left) N.K. Joshi, B.G. Dandekar, S.B. Gokhale, V.V. Gandhe, Sahebrao Desai, D.A. Kulkarni & V.V. Mukim



Shri. Vilas V. Gandhe, Circle Secretary, addressing the gathering



Shri. S.B. Gokhale, Circle President, addressing the gathering



Shri. B.G.Dandekar addressing the gathering



Shri. N.K. Joshi welcoming Shri. U.S. Kolhe, AGM (RBO-1), Aurangabad Zonal Office



'Late N.G. More Service Awards', awarded to Shri. Kolhatkar & Shri. Patrikar being handed over to Shri. Sawhney, Pres. Nagpur



Shri. B.G. Dandekar being felicitated at the hands of Shri. U.S. Kolhe, AGM (RBO-1), Aurangabad Z.O.



Shri. S.B. Gokhale being felicitated at the hands of Shri. U.S. Kolhe, AGM (RBO-1), Aurangabad Z.O.

# संपादकीय

प्रिय सभासदमित्रांनो,

'संवाद'चा हा ऑक्टोबर २०१७ चा दिवाळी विशेषांकरूपी विविध साहित्यकृतींनी भरलेला 'साहित्य घट' आपणा रसिक व साहित्यप्रेमी मंडळींच्या हाती सुपूर्द करतांना आमच्या मनात कृतज्ञतेची, धन्यतेची, आनंदाची अन् समाधानाची भावना दाटून आलेली आहे. आपण आमच्यावर मनापासून प्रेम करता, 'संवाद'ची दर महिन्याला आपण आतुरतेने वाट पाहता, अंक मिळण्यास थोडा जरी विलंब झाला तरी आपण अस्वस्थ होताा आणि त्याविषयी दूरध्वनीवरून आस्थेने चौकशी करता, 'संवाद'च्या अगदी पहिल्या पानापासून म्हणजे 'संपादकीया'पासून शेवटच्या पानापर्यंत अंक संपूर्णपणे नि बारकाईने वाचता, वेळोवेळी आपला अभिप्राय-प्रतिक्रिया कळवता, 'संवाद'च्या व 'असोसिएशन'च्या सादाला नि आवाहनाला प्रतिसाद देता या सर्व गोष्टींची आम्हाला पूर्ण जाणीव आहे; म्हणूनच आम्ही ठामपणे असं म्हणू शकतो की आपल्यामधील हे नातं अभेद्य आहे, अजोड आहे नि अभंग आहे.

आम्हाला जाणीव आहे की दिवाळी आली की आबालवृद्ध जसे दिवाळीच्या फराळाची वाट पाहात असतात तद्वत आपणासारखे साहित्यरसिक 'संवाद'रूपी 'साहित्यिक फराळा'ची वाट पाहात असतात. म्हणूनच 'संवाद'च्या दिवाळी विशेषांकात विविध साहित्यकृतींसाठी अधिकाधिक पाने उपलब्ध करून दिली जातात, त्यांना प्राधान्य दिलं जातं. या धोरणामुळेच आपल्या अनेक सभासदांनी अनेक वर्षे मनापासून जपलेल्या व जोपासलेल्या लेखनकलेच्या छंदाला प्रोत्साहन मिळतं, आपल्यातील लेखन-गुणांची बूज राखली जाते.

'संवाद'ची पृष्ठसंख्येची मर्यादा आम्हाला अपरिहार्यपणे नि कटाक्षपूर्वक पाळावीच लागते याची आपणा सर्वांना कल्पना आहेच. पण ही पृष्ठसंख्येची मर्यादा पाळून देखील आमचा दर्जेदार व उत्तम गुण असलेल्या साहित्यकृती सादर करण्याचा प्रामाणिक प्रयत्न असतो. आपल्यापैकी कोणी प्रथितयश साहित्यिक नसले तरी आपल्यातील लेखनगुण दुर्लक्ष करण्यासारखे नाहीत हे सत्य आहे आणि म्हणूनच त्यांना प्रसिद्धीचा प्रकाश दाखविणे अवश्य आहे असं आमचं स्पष्ट मत आहे आणि त्यानुसार आमचं आचरण असतं. त्यासाठी 'संवाद' हे आमच्या मते आपल्यासाठी उत्तम माध्यम आहे.

आपल्यापैकी अनेकजणांना पेन्शनची थकबाकी मिळाली असेलच. त्यामुळे ते सध्या 'अच्छे दिन' अनुभवीत असतील; आपल्या सर्वोच्च न्यायालयातील अंतिम निर्णयही आपल्या बाजूने त्वरित लागो आणि आपणा सर्वांनाच उचित न्याय मिळून 'अच्छे दिन' अनुभवावयास मिळोत अशी आमची परमेश्वराजवळ प्रार्थना आहे.

सर्व सभासदांना व त्यांच्या कुटुंबीयांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा! शुभ दीपावली!! शुभं भवतु !!!

क्रांतिसेन रामचंद्र आठवले
मो. ९५५२५९२२७९

**Our Case No 1875 of 2013 in Delhi High Court**

**O R D E R Dt.13.09.2017**

It is stated that the notification has not been issued by the Union of India for some reason. In these circumstances, the hearing would continue as we are not inclined to adjourn the matter further. As and when the notification is issued, the effect thereof would be considered. Relist on 25th September, 2017.

**ORDER Dt.25.09.2017**

Re-list on 26th September, 2017.

**The above case is now posted to 23.10.2017**

## युनिट वार्ता

आपल्या पालघर शाखेतर्फे 'निवृत्तीवेतनधारकांसाठी बैठक' दि. ३ ऑक्टोबर २०१७ रोजी आयोजित केली होती. या बैठकीला सेक्रेटरी श्री.लोपेस उपस्थित होते. प्रथम शाखाधिकारी श्री.शासिकुमार, श्री.लोपेस व श्री.सावंत यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. नंतर श्री.लोपेस यांनी ९व्या, ६व्या व ७व्या द्विपक्षीय करारानुसार त्या काळात निवृत्त झालेल्या निवृत्तीवेतनधारकांना कोर्टाच्या आदेशानुसार बँकेकडून मिळणाऱ्या थकबाकीसंबंधी माहिती दिली. व ज्या निवृत्तीवेतनधारकांना अशी थकबाकी मिळाली आहे वा मिळणार आहे त्यांनी असोसिएशनला जास्तीतजास्त देणगी द्यावी असे आवाहन केले. ह्या आवाहनानुसार याच बैठकीत सर्वश्री हरेश्वर म्हात्रे, आत्माराम तरे, शरद वेंगुर्लेकर, व गणेश शर्मा यांनी प्रत्येकी रु.५,०००/-, तसेच श्री.कमलाकर चौधरी यांनी रु.२,०००/- असे एकूण रु.२२,०००/- असोासिएशनला देणगी दिली. त्याबद्दल सर्वांनी त्यांचे टाळ्या वाजवून कौतुक केले. त्याच बरोबर बैठकीस उपस्थित असलेले सर्वश्री कमलाकर तरे, के.के.तरे व लहू पाटील हे असोसिएशनचे नविन सभासद झाले. या नंतर आभारप्रदर्शन व चहापान झाल्यावर बैठक समाप्त झाली.

**सचिव, पालघर युनिट**

## पेन्शन ॲरिअर्स संबंधी फॅमिली पेन्शनर्ससाठी महत्त्वाची सूचना

आपल्या असोसिएशनच्या ऑफिसमध्ये फोनवरून सतत विचारणा होत असते की, ''बँकेने ९व्या, ६व्या व ७व्या बायपार्टाइट लागू असलेल्या बऱ्याच पेन्शनर्सना पेन्शनमधील वाढीनुसार ॲरिअर्स दिले आहेत. मग आमचे 'SPOUSE' (पति अथवा पत्नी) वरील बायपार्टाइट काळात निवृत्त झाले. पण दुदैवाने ते आज हयात नाहीत. त्यामुळे आम्हाला फॅमिली पेन्शन मिळत आहे. मग बँक आमच्या 'SPOUSE' ना त्यांच्या मृत्यु तारखेपर्यंतचे लागू असलेले पेन्शन ॲरिअर्स आम्हाला देणार कां? आणि कधी?''

या बाबत एक खुलासा आम्ही करू इच्छितो की, अजूनपर्यंत कोणत्याही फॅमिली पेन्शनरला बँकेने ॲरिअर्स दिलेले नाहीत. बँकेच्या कॉर्पोरेट सेंटर मधील लीगल डिपार्टमेंटमध्ये या बाबत म्हणजे ॲरिअर्स पे करण्यापूर्वी फॅमिली पेन्शनरकडून कोणकोणती कागदपत्रे मागवायची या बाबत विचारविनिमय चालू आहे. व त्या बाबत लवकरच बँकेकडून परिपत्रक काढण्यात येईल. ते निघाल्यावर फॅमिली पेन्शनर्सच्या माहितीसाठी 'संवाद' मधून प्रसिद्ध करण्यात येईल **– सेक्रेटरी**

## देणगीसाठी आवाहन

ज्या सभासदांना आत्तापर्यंत पेन्शन ॲरिअर्स मिळाले आहेत अशांपैकी अनेक सभासदांनी आमच्या ऑगस्ट २०१७ च्या 'संवाद' मधील आवाहनानुसार असोसिएशनला देणग्या दिलेल्या आहेत. अशा सर्व सभासदांचे मन:पूर्वक आभार ! अशा सभासदांची नावे 'संवाद' च्या सप्टेंबरच्या अंकात प्रसिद्ध केली आहेत. तसेच त्यानंतर जमा झालेल्या देणगीदारांची नावे पुढील 'संवाद' मधून प्रसिद्ध करण्यात येतील.

उर्वरित सर्व ॲरिअर्स मिळालेल्या सभासदांना, तसेच यापुढेही ज्या सभासदांना ॲरिअर्स मिळतील अशा सर्व सभासदांना आवाहन करण्यात येत आहे की मिळालेल्या ॲरिअर्स रकमेच्या किमान १० टक्के रक्कम असोसिएशनला देणगी म्हणून द्यावी ही विनंती. ज्यांनी आत्तापर्यंत देणग्या दिल्या आहेत त्यांचे पुन:श्च आभार ! **– सेक्रेटरी**

***!! सर्व सभासदांना दिपावली निमित्त हार्दिक शुभेच्छा !!***



We welcome Shri. Rajnish Kumar, aged 59 yrs, who has been appointed as Chairman of State Bank of India on 7th October 2017 for three years. Prior to this appointment, he was Managing Director - Compliance and Risk, and Managing Director and Chief Executive Officer of SBI Capital Markets Limited, the merchant banking arm of SBI. Shri. Rajnish Kumar has worked as Chief General Manager, Project Finance and Leasing Strategic Business Unit. He has held several key assignments across various business verticals, including two overseas assignments in Canada and the UK.

**We wish him all the success in his new assignment**

## Important News from the desk of Circle Secretary, Shri.Vilas Gandhe :

Shri.Vilas Gandhe, Circle Secretary, in consultation with Shri.S.B.Gokhale, Circle President, has advised that a 'Special Annual General Meeting' of the SBI Pen Assn (Mumbai Circle), Pune has been convened on 26th November 2017 at Nagpur. The details are as under.

****************************************************

Notice: 2017-2018 Date: 14th October 2017

## Special Annual General Meeting

It has been decided to hold a Special Annual General Meeting of the Association at 09.30 a.m. on Sunday the 26TH November 2017 at Nagpur on the following address.

**"State Bank of India, Zonal Office premises, Ground Floor, Kingsway,
Near Railway Station Nagpur - 440001"**

to transact only the following business. No other item will be discussed in this 'Special AGM' which please note.

1) To confirm the 'Election Rules of the SBIPA, (Mumbai Circle), Pune', as approved in the 'Special Annual General Meeting held on 17th September 2017' at Aurangabad.
2) To confirm the 'Amendments to Bye Laws', as approved in the 'Special Annual General Meeting held on 17th September 2017' at Aurangabad.

All the Members are requested to make it convenient to attend the 'Special AGM'.

We advise our Members that this Notice along with the 'Election Rules of the SBIPA, (Mumbai Circle), Pune' and the 'Amendments to Bye Laws' as approved in the 'Special Annual General Meeting' of the Association held on 17th September 2017 at Aurangabad are also available on our 'Website'.

Secretary
(Vilas Gandhe)

************************************************************************************

## SBI Pensioners Association Z. S. C. Nagpur
## Important Announcement

Shri Sudhir Agrekar, Secretary, Nagpur ZSC, has advised that the **Annual General Meeting of the NAGPUR ZSC & The PENSIONERS' MEET** scheduled to be held on 15.10.2017 as printed on page No.17 of 'Samvad' for Sept.2017, has since been **postponed to Sunday the 26th November 2017.** The Meeting will commence at 10.00 A. M.

All the Members of the Nagpur ZSC are therefore requested to attend the AGM on 26.11.2017. The inconvenience caused to the Members is deeply regretted.

(We reproduce hereunder a mail and Circular Letters No 2 and 3,sent by our Federation, to the Deputy General Manager & PM, Corporate Centre, Mumbai, for the information of our Members.)

*********************************************************************

Date: 13th September, 2017

"We have to advise that while up to 28th August, 2017 regularly ad-hoc payments were being made to the delightment of elderly eligible pensioners', several thousands of them are still eagerly waiting for credits to their A/cs. We request for immediate resumption of payment. We also have to submit that there are more eligible pensioners whose names have not found place in the CAO/ Corporate Centre lists. Those names may kindly be included in the list for payment. These pensioners' names ought to be available with LHOs. Data for the spouses of expired eligible pensioners have already been submitted. Trust payment to them would begin now.

The festival season is knocking at the door. The elderly pensioners would definitely smile on receipt of ad-hoc payment to which they have been deprived for long years.

We request your kind intervention."

*********************************************************************************

CC 2/2017-18 Date: 4th October 2017

**FAMILY FLOATER GROUP MEDICLAIM POLICY - 'A'**

"We refer you the Corporate Center Circular no CDO/P&HRD-PPG/17/2017-18 dated 30th May 2017. The captioned circular deals with renewal of policy "A" for one year period with effect from 1st June 2017. While renewing the policy the Bank in order to keep a check on cost of treatment for certain ailments has fixed cost for each ailment according to the centres (classified as Tier-1, Tier-2 and Tier -3 centre). Now a situation has arose that in some hospitals classified as Tier -1 centre the cost of operation is estimated more than the cost fixed by the Bank. The Insurance authorities have made it clear to the pensioner that amount estimated over and above the prescribed limit have to be borne by the pensioner.

This painful situation could have been avoided had the Insurance Co identified hospitals in all the above centres, as per the rates fixed in terms of the above circular and circulated the details of the hospitals to the entire policy holders under policy "A" to avoid hardship to the aged pensioners/family pensioners or rest of the amount would have been paid from the remaining balance of the pensioner's "Corporate Buffer".

We hope the Corporate Centre will initiate a dialogue with the Insurance Co and hasten up the process for identifying hospitals under the above norms, at the earliest for the benefit of aged retirees."

********************************************************************

CC-3/2017-18 Date: 4thOctober, 2017

**FAMILY FLOATER MEDICLAIM POLICIES-POLICY 'A' & 'B'**

"We have to advise that even after two years of introduction of Insurance Scheme "A "(REMBS) and Insurance Policy 'B' the difficulties of retirees have not come to a point of comfort.

**Policy 'A' (REMBS)**

This scheme was in vogue as REMBS for more than a decade. On 1st of June 2015 the data relating REMBS containing details of 66,000 retirees was brought under the Policy -'A'. The premium is paid by the Bank every year as long the balance available in the individual account of the pensioner is not less than Rs. One lac. The pensioners shall ensure to become member of the scheme "B" within 90 days from when the balance in scheme "A" goes down to below Rupees One lac.

(.......on next page)

The problems faced by the pensioners in Policy "A" are furnished below

i. While migrating, lot many pensioners' data were not migrated or migrated for the less amount,
ii. In majority of the cases the ID cards were not issued to the principal pensioners and his/her spouse while renewing the scheme on 1st June this year,
iii. The cards so issued are spelt wrongly in respect of name and gender
iv. This year surprisingly the UIIC choose to dispatch the ID cards to administrative offices, in some circles, instead of mailing to the residential address of the pensioners causing further chaos to the aged pensioners. This has to be relooked and the old practice of mailing to the residential addresses of pensioners may be followed.
v. The buffer amount appropriation is causing serious hardship to the pensioners as this amount is not being appropriated while settling the final payment of the bills resulting lot of frustration among the retirees. In such a situation, the pensioner has to meet the shortfall from his own resources and get discharged from the hospital and subsequently said bills are also not being reimbursed by the Bank from "Corporate Buffer",
vi. The delay in payment of bills in domiciliary has become order of the day, at times it is more than 8/9 months and Insurance Co is also not paying interest for the delay as per IRDA norms,
vii. The identified hospitals are de-recognised overnight without intimation to the members of the scheme,
viii. The bills relating to pathological reports are returned for want of attestation by a physician of MD qualification. In many of the places this facility is not available. Some solution is to be found urgently.
ix. Prescriptions of registered Homeopaths with cash memos, which were being reimbursed earlier, are not being paid now instead pensioners are asked to provide registration number of the clinic despite having registration of the doctor and proper cash memos.
x. All the receipts relating to consultation need to have serial number of the money receipt.
xi. Similar delay in rejection of bills. In fact these bills can be rejected at the time of submission of bills for reimbursement. All bills should be placed before the committee formed at Zonal Office level before any rejection, as per provision of the Bank's circular.

The position of Scheme "B" is not different. The branches have to download the application for enabling the pensioner to fill in all the particulars. Thereafter the application with details is uploaded to the A.O. and the premium money is remitted directly to Corporate Centre. There is no problem in respect of remittance but the application is not uploaded by the branch to A.O. in time and consequence of which the Corporate Centre in the absence of application cannot transfer money to UIIC, resulting in non-issuance of ID cards. Here again the pensioner is in trouble while admission to the hospital and treatment thereof. While introduction of GST from 1st July 2017 remittances send to Corporate Centre on 29th itself but not uploaded on the same day the excess amount on account of the GST from 1st July branches are asking pensioners to pay difference of amount without any fault of them.

नोव्हेंबर महिन्यात बँकेत जाऊन लाइफ सर्टिफिकेट द्यावे

Further, the problem of non-issuance of cards, wrong spelling of names, non-receipt of subsidy to the policyholders even non-refund of excess premium in the 1st year of policy"A" from February 2016 to June 2016 still awaiting.

We fail to understand the involvement of A. O.s in uploading the application to them; instead it would be better if the application along with the particulars of remittance is sent direct to Corporate Centre duly marking a copy of the application to A.O.s for information.

We feel that any facility introduced to better the health issues should not cause hardship to the pensioners and leave them with feeling that why at all they have taken this policy. Now also feeling among the pensioners is that REMBS was better scheme than all the present schemes.

Time and again we have requested Corporate Centre to form a 'Core Committee' involving a few of the Federation Office bearers with Bank/UIIC/Anand Rathi representatives and to have meetings periodically for better understanding of the issues involved.

We are confident that the above said problems could be resolved amicably if, Corporate Centre initiate necessary steps to resolve the genuine grievances of the pensioners who served this institution for a long period and they are now at the evening of their life."

**************************************************************************************

स्टेट बँक परिवारासाठी सवलतमुल्यात देश-विदेश सहली

राजगुरू टुर्स™

जिव्हाला जपणारी माणसं...

| | | |
|---|---|---|
| दुबई - अबुधाबी | 15 जाने, 6 फेब्रु, | 5 दि. |
| अंदमान-हॅवलॉक | 19 डिसें, 15, 28 जाने, | 6 दि. |
| सिंगापुर-थायलंड | 23 डिसें, 22 एप्रि, 2 मे, | 10 दि. |
| भुतान | 8 मार्च, 15, 20 मे, | 8 दि. |
| श्रीलंका | 21 जाने, 18 फेब्रु, | 7 दि. |
| युरोप | 28 एप्रि, 6 मे, 25 जुन, | 10/14 दि. |
| अमेरीका | 15 मे, | 15 दि. |
| ऑस्टेलिया | 3 मे, | 11 दि. |

Customized Packages All Over India & World

केरळ • राजस्थान • मध्यप्रदेश • पुरी • सौराष्ट्र • काशी-गया

राजन पाडलोसकर 9322231216

दादर: 022-24318082 | 24381026 ठाणे : 25345606

www.rajgurutours.com • E-mail : rajgurutours@yahoo.in

ONLY FOR SENIOR CITIZENS

JUST FOR RELAXATION

COMFORTABALE HOME STAY @ ALIBAG

Aashiyana Resort

3 NIGHTS 4 DAYS

EVERY MONDAY CHECK IN & THURSDAY CHECK OUT

FOR 3 DAYS PACKAGE COST

RS 2500/- PER PERSON

NON AC ROOM STAY & VEG FOOD

NON VEG FOOD & AC ROOM COST EXTRA

DAILY: BREAKFAST+LUNCH& DINNER WITH TEA COFFEE

Contact: Rajesh Ranade

750 7474 825

Post Akashi-Alibag-Murud Rd-Near Amit Beer Shoppy

## Pension Revision of 5th, 6th & 7th Bipartite Retirees - "ELIGIBILITY Criteria"

The Bank has published the 'Eligibility Criteria' for 5th, 6th & 7th Bipartite retirees on its website for pensioners - **'SBI Coin'** (https://www.sbi.co.in/sbipension/user.htm) which we are publishing here for information of the members.

- Secretary

*****************************************************************************

**Pension Revision for 5th, 6th & 7th Bipartite Retirees**

| Category of Pensioners | GOI Instructions | Who is Eligible for Revision in Pension and Arrears | Details of Revision |
|---|---|---|---|
| 5th Bipartite | The ceiling of Pension be revised to Rs.3775/- p.m. w.e.f. 01-11-1987 | Pensioners who retired between 01-11-1987 to 31-10-1992 | Maximum ceiling of Pension has been raised from Rs.2400/- to Rs.3775/-<br>- Only those pensioners who are presently in receipt of basic pension equal to Rs.2400/- are eligible for revision / arrears.<br>- In all such eligible cases, basic pension will be recalculated on the basis of the average salary paid in the last 12 months of service.<br>- In cases where such calculated basic pension falls between Rs.2400/- to Rs.3775/-, the actual amount calculated will be the new basic pension.<br>- In cases where such calculated basic pension is above Rs.3775/-, the maximum veiling i.e. Rs.3775/- will be taken as the new basic pension fixed. |
| 6th Bipartite | The ceiling of pension be raised to Rs.4250/- p.m. w.e.f. 01-11-1992 for Award Staff and from 01-11-1993 for officers instead of 01-11-1993 | **Pensioners who retired between :**<br>**Officers :**<br>01-07-1993 to 31-10-1993<br>**Award Staff :**<br>01-11-1992 to 31-10-1993 | Maximum ceiling of Pension has been raised from Rs.2400/- to Rs.4250/-<br>- only those pensioners who are presently in receipt of basic pension equal to Rs.2400/- are eligible for revision / arrears.<br>- In all such eligible cases, basic pension will be recalculated on the basis of the average pay in the last 12 months of service.<br>- In cases where such calculated basic pension falls between Rs.2400/- to Rs.4250/-, the actual amount calculated will be the new basic pension.<br>- In cases where such calculated basic pension is above Rs.4250/-, the maximum ceiling i.e. Rs.4250/- will be taken as the new basic pension fixed. |
| 7th Bipartite | The maximum amount of pension for the pay upto Rs. 14,240/- p.m. shall be computed at 50% of the pay and where pay is above | **Pensioners who retired between :**<br>**Officers :**<br>01-04-1998 to 31-10-2002<br>**Award Staff :**<br>01-11-1997 to 31-10-2002 | - In this category of pensioners, pay as per 6th bipartite settlement was originally reckoned for the purpose of calculation of basic pension.<br>- Now as per amendment, pay as per 7th bipartite has to be reckoned for calculation of basic pension. |

| | | | |
|---|---|---|---|
| | Rs.14,240/- p.m.be computed at 40% of the pay w.e.f. 01-11-1997 for Award Staff and 01-04-1998 for Officers. The payment of pension for the period between 1-11-1997/ 1-04-1998 to 30-04-2005 be made by arriving at the corresponding stage by dividing the average basic pay by 1684 and multiplying it by 1616 subject to a minimum of Rs.6883/- for 40% slab(=half of Rs.14240/- multiplied by 1616 and divided by 1684), and thereafter,as computed subject to minimum of Rs.7120/- for 40% slab) | | - In cases where corresponding pay as per 7th bipartite is upto Rs.14,240/-, basic pension to be calculated @ 50% of average pay and thereafter, above Rs.14,240/-, basic pension to be calculated @ 40% of average pay with minimum of Rs.7,120/-.<br>- For the period 01-11-1987 / 01-04-1998 to 30-04-2005, the average pay (as per 7th bipartite) will be divided by 1684 and multiplied by 1616, subject to a minimum of Rs.6,883/- for 40% slab (=half of Rs.14,240/- multiplied by 1616 and divided by 1684), and thereafter, as computed subject to minimum of Rs.7,120/- for 40% slab. |



## औदार्य

पक्या - (मित्रास) ''काय रे मन्या, एरवी तुझ्याकडे नुसता चहा मागितला तरी तू काचकूच करतोस. आणि आज बसमध्ये तू त्या मुलीचे तिकीटाचे पैसे दिलेस.

मन्या - अरे ! बसमध्ये तिचं पाकीट कोणीतरी 'मारलं' असं ती कंडक्टरला सांगत होती.


पक्या - मग तू का तिकीटाचे पैसे दिले?

मन्या - (हळूच) अरे! मीच तिचे पाकीट मारले. त्यातलेच तिला तिकीटाला पैसे दिले. अडीअडचणीला नेहमी दुसऱ्यांना मदत करायला नको का? चल, आज तुला 'स्पेशल' चहा पाजतो.

प्रभाकर गुपचूप

मो. ९८८१५७९४९९

## विक्रम



मालकीणबाई - (मोलकरणीस) अगं! चागला बातमी आहे. एका मुलीने दोरीवरील उड्या मारण्याचा स्वतःचाच विक्रम मोडीत १ मिनिटात १५० उड्या मारल्या. खूप कौतुक केलं सर्वांनी.

मोलकरीण - मागच्या महिन्यात माझे १० खाडे झाले तर तुम्ही म्हणालात ''तू खाड्यांचा विक्रमच केलास.''

मालकीण - बरं मग?

मोलकरीण - आता या महिन्यात १५ खाडे करून मी माझाच विक्रम मोडणार आहे.

प्रभाकर गुपचूप

मो. ९८८१५७९४९९

# स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशनचे सदाबहार असे सोलापूर युनिट

पुणे झोनल सब सेंटरच्या अखत्यारीत सोलापूर जिल्हा येतो. सोलापूर जिल्ह्यात आमच्या संघटनेचे एकूण ६०० च्या वर सभासद आहेत व हा जिल्हा अत्यंत कार्यक्षम आहे. याचे सर्व श्रेय श्री. तम्मा. पाटील, सोलापूर जिल्हा, सचिव, यांना व त्यांच्या सर्व सहकार्यांना जाते.

गेल्या १५-२० वर्षात अनेक जण निवृत्त झालेत. बरेच जण अजूनही मनाने तरुण व शरीराने तंदुरुस्त आहेत. बँकेतील जबाबदारीमुळे काही गोष्टी आयुष्यात करायच्या राहिल्या आहेत. तसेच आवडीचे छंद जोपासता आलेले नाहीत, वेळेअभावी सामाजिक बांधिलकी जपता आली नाही. अशा अनेकांनी निवृत्तीनंतर मात्र वयाचे बंधन झुगारुन आतापर्यंतच्या आयुष्यात राहिलेल्या गोष्टी करण्यास जोमाने सुरुवात केली आहे. काही जण आपल्या ज्ञानाचा व अनुभवाचा उपयोग एखाद्या संस्थेस करुन देत आहेत. काहीजण अनेक प्रकारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत आहेत. बरेचसे पेन्शनर्स गायन, वादन, योग-प्राणायाम, आयुर्वेद उपचार, शेती इ. अनेक क्षेत्रात आपणास गुंतवून घेत आहेत. काहीजण निवृत्तांसाठी काम करीत आहेत. त्यांच्या अडीअडचणी सोडविण्यास मदत करीत आहेत. काही पेन्शनर्स ज्ञानेश्वरी, दासबोध, तुकारामांची गाथा इ. चे सामुदायिक पारायण, भजन, व्याख्याने, कॉम्प्युटर, नेट, ज्योतिषशास्त्र कथा, कादंबरी, लेखन इ. कामात मग्न रहात आहेत. काही जण शिक्षण व धार्मिक संस्थांना आर्थिक मदत करत आहेत, ते पण आपले नाव कुठेही प्रसिद्ध न होता. थोडक्यात काय तर हे सर्व पेन्शनर्स आपापल्या कुवतीप्रमाणे शक्य असेल तेथे काहीना काही समाजसेवा इ. करुन समाजाचे आपल्यावर असलेले ऋण फेडण्याचा प्रामाणिक प्रयत्न करीत आहेत. या प्रयत्नामुळे ते स्वतः कार्यमग्न राहून इतरांना पण आनंद देत आहेत.

आमच्या सर्कल असोसिएशनची तसेच प्रत्येक झोनल सब सेंटरची सर्वसाधारण वार्षिक सभा होते. त्याच धर्तीवर जिल्हा युनिटस्‌ची पण वार्षिक सभा होत असते. मला जानेवारी २०१७ रोजी सोलापूर युनिटच्या वार्षिक सभेस हजर रहाण्याचा योग आला. सभेस साधारण २५० च्या वर सभासद-सहसभासद उपस्थित होते. ही सभा जवळजवळ ३ तास चालली व सभेचे नियोजन अत्यंत उत्कृष्ट होते. श्री. शशिकांत लावणीस, जे सांस्कृतिक क्षेत्रात अनेक वर्षे काम करीत आहेत, त्यांनी संपूर्ण सभेचे अत्यंत प्रभावीपणे सूत्रसंचालन केले. या सभेत जवळ जवळ १६ जणांचा ते करीत असलेल्या उत्कृष्ट कार्याचा/सेवेचा सत्कार करण्यात आला. हे सर्व पेन्शनर्स करीत असलेल्या कार्याची माहिती थोडक्यात देत आहोत.

१) **श्री श्रीरंग एकनाथ चव्हाण -**

नोकरीतून निवृत्त झाल्यावर इतरांच्या सेवेस प्रवृत्त व्हावे व त्यातून आनंद मिळावा या हेतूने श्री चव्हाण यांनी खालील सामाजिक कार्य सुरु केले.

i) घरातील लहान बाळांच्या संगोपनासाठी त्यांच्याकडील देशी गायीचे दूध मोफत दिले जाते. आतापर्यंत ३ अत्यंत गरीब घरातील लहान बालकांचे पोषण झाले आहे. तसेच गावातील गरजू रुग्णांना देशी गायीचे गोमुत्र मोफत घरपोच केले जाते.

ii) श्री. चव्हाण यांच्या शेतामध्ये काही औषधी वनस्पतींची लागवड केलेली आहे. उदा. कोरफड, गुळवेल, पानकत्री, कढीपत्ता इ. गरजूंना त्या मोफत दिल्या जातात.

iii) पाठीच्या मणक्याचा त्रास असणाऱ्या गरीब महिला मजुरांना श्री. चव्हाण यांनी कमरेच्या १० बेल्टचे वाटप मोफत केले आहे.

iv) श्री. चव्हाण २००९ सालापासून ओम शांतीच्या कार्यात सहभागी असल्याने त्या कार्यासाठी नियमित दरमहा रु. ५००/- ची सेवा त्यांचेकडून केली जाते. आतापर्यंत रु. ४२,०००/- ची आर्थिक सेवा करण्याचे भाग्य त्यांना लाभले आहे.

v) गोरगरीबांच्या औषधासाठी, कोणाच्या लग्नकार्यासाठी, गरीब मुलांच्या गणवेशासाठी, वह्यांसाठी, वृक्षारोपणासाठी अशा वेगवेगळ्या कारणासाठी अनेक गरजूंना सेवानिवृत्तीनंतर त्यांनी आतापर्यंत एकूण रु. ६६,६४५/- ची सेवा पुरवली आहे.

२) **श्री विजयकुमार अय्यर -**

हे किडनीदानाविषयी लोकांमध्ये जागृती पसरवण्याचे काम करीत आहे. स्टेट बँक पेंशनर्स परिवारातील सदस्य

श्री विजयकुमार अय्यर यांना त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. जयमाला अय्यर यांनी किडनीचे दान दिले. किडनीच्या आजारात जो दुःखदायक अनुभव आणि जो जीवघेणा त्रास या दांपत्याने सोसला तो इतर रुग्णांना कमी प्रमाणात व्हावा यासाठी अय्यर दांपत्याने आपला अनुभव कथन करुन समुपदेशनाचा मार्ग निवडला. त्यांच्या या कार्यास सहजता येण्याच्या उद्देशाने त्यांनी ''आस्था किडनी रुग्ण मित्र बहुउद्देशीय चॅरीटेबल ट्रस्ट'' ची स्थापना केली. या माध्यमातून अनेक रुग्णांना त्यांनी समुपदेशन केले आहे. त्यांच्या या कार्यामुळे अनेक शस्त्रक्रिया यशस्वी झाल्या आहेत. आजवर जवळपास १५ ते २० रुग्णांच्या नातेवाईकांना या कुटुंबियांनी समुपदेशन केले आहे. किडनीचा त्रास असलेल्या रुग्णांसाठी रात्रंदिवस मनापासून झटणारे हे कुटुंब सोलापूर जिल्ह्यातच नव्हे तर महाराष्ट्रात एकमेव होय असे अनेक तज्ञ, रुग्णांचे नातेवाईक व्यक्त करतात.

''जिते जिते रक्तदान करो, जाते जाते अंगदान करो.'' असा सामाजिक संदेश हे दांपत्य देत आहे.

### ३) सौ हेमा अनंत मोडक -

यांनी ''श्री. श्रीपाद वल्लभ नित्यसेवा'' हा ग्रंथ लिहिला आहे. ''श्रीपाद श्रीवल्लभ चरीतांमृत'' हा मराठीतील मूळ भाषांतरीत ग्रंथ खूप मोठा आहे.

एवढे मोठे चरित्र रोज वाचणे शक्य नाही तेव्हा जर ते ओवीरुप केले तर वाचनास सुलभ होईल. तसेच संपूर्ण चरित्रच सारांशाने केले तर ते रोज वाचले जाईल. म्हणून १२७ ओव्यांचे ''श्री. श्रीपाद वल्लभ चरितांमृत सार'' लिहिले. हे ५३ अध्यायांचे आहे. म्हणून ५३ ओव्यांची ''श्री श्रीपाद वल्लभ त्रेपन्नी'' आणि श्री श्रीपादांची जन्मलीला फार रंजक आहे म्हणून ४७ कडव्यांचे ''गीत श्रीपाद'' असे त्रिदल यामध्ये आहे. तसेच सिद्धमंगल स्तोत्र, ५ आरत्या, श्री अक्कलकोट स्वामी समर्थांचा तारक मंत्र आणि समर्थाष्टक असे सर्व मिळून नित्यसेवा घडावी या हेतूने हा लेखन प्रपंच सौ. मोडक यांनी केला आहे.

या ग्रंथाचे प्रकाशन श्री शुभराय मठात सफला एकादशीच्या दिवशी म्हणजे दि. १६ डिसेंबर २०१६ रोजी सर्व भक्तांच्या उपस्थितीत करण्यात आले. याप्रसंगी सौ हेमा मोडक यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

### ४) श्री. सुधीर देव -

भारताचे माजी राष्ट्रपती कै. ए. पी. जे अब्दुल कलाम यांनी कमी खर्चात विकसित केलेले जयपूर फूटस् भारत विकास परिषद ही संस्था (संपूर्ण देशात यांच्या १२५० शाखा कार्यरत आहेत) अपंग व्यक्तींना विनामूल्य पुरविते. या संस्थेने त्यांच्या सोलापूर शाखेत सेवाभावे काम करणारे आपले पेन्शनर सदस्य श्री. सुधीर देव यांचे मार्फत काही मदत करण्याची विनंती केली. या विनंतीचा सन्मान करुन सोलापूर युनिटने रु. ११,०००/- ची देणगी दि. २२ एप्रिल २०१६ रोजीच्या साप्ताहिक सभेत वरील संस्थेच्या सोलापूर शाखेत दिली.

श्री. देव यांचा संस्थेतर्फे राबविण्यात येणाऱ्या अनेक उपक्रमात सहभाग असतो.

### ५) श्री. लक्ष्मण सिद्राम जाधव -

स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशनचे सभासद श्री. लक्ष्मण सिद्राम जाधव यांचे ''होरपळ'' हे आत्मकथन असलेले पहिलेच पुस्तक, या पुस्तकास २०१२ सालचा राज्य सरकारचा 'लक्ष्मीबाई टिळक' हा उत्कृष्ट वाङमयाचा पुरस्कार मिळाला. हे पुस्तक मराठी सारस्वतांनी खूप खूप प्रशंसले आहे. श्री जाधव यांचे तिसरे पुस्तक ''सुंभ व पीळ'' दलित जीवनावरची एक आगळी वेगळी कादंबरी आहे. या कादंबरीस राज्य सरकारचा 'लोकशाहिर आण्णा भाऊ साठे' पुरस्कार मिळाला आहे. रु. १ लाख रोख व मानचिन्ह असे याचे स्वरुप आहे. सोलापूरच्या एकाच लेखकास दुसरा पुरस्कार मिळणे ही अत्यंत मोठी व कौतुकाची गोष्ट आहे.

श्री जाधव यांना अनेक पुरस्कार मिळालेले आहेत. 'ग. दि. मा. प्रतिष्ठान, पुणे' यांच्या वतीने उत्कृष्ट कादंबरीचा तसेच मृत्युंजयकार शिवाजी सावंत साहित्य पुरस्कार त्यांच्या 'सुंभ व पिळ' या कादंबरीस ३१ ऑगस्ट २०१४ रोजी देण्यात आला.

सोलापूर आकाशवाणीवरुन सध्या श्री जाधव यांच्या 'मावळतीची उन्हे' या कादंबरीचे अभिवाचन चालू आहे.

### ६) श्री. शशिकांत लावणीस -

सोलापूरची कलासृष्टी संपन्न करणारे प्रतिभावंत कलावंत, नाटककार, दिग्दर्शक, अभिनेते, कवी अशा बहुरंगी व्यक्तिमत्वाने सोलापूरकरांना परिचित असलेले

स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशनचे सदस्य श्री. शशिकांत लावणीस सतत नाट्यक्षेत्रात, साहित्यक्षेत्रात व्यस्त असतात. कोल्हापूरात काही दिवसांपूर्वी झालेल्या नाट्य अभिवाचन स्पर्धेत २५ स्पर्धकामध्ये ''त्रिबंध'' या अभिवाचनाचे रु. ५०००/- चे प्रथम पारितोषिक त्यांना देण्यात आले.

**७) श्री. भाऊ टिळक-**

चाळीस वर्षे क्रिकेटला योगदान देणारे साऊथ सोलापूरचे प्रशिक्षक श्री अशोक नारायण टिळक उर्फ भाऊ टिळक यांना जिल्हा क्रिकेट संघटनेतर्फे 'जीवन गौरव पुरस्कार' संघटनेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत जिल्हा क्रिकेट संघटनेचे चेअरमन, श्री रणजितसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते देऊन गौरवण्यात आले.

**८) श्री. लक्ष्मण जगताप -**

आपल्या असोसिएशनच्या सोलापूर युनिटचे सदस्य श्री लक्ष्मण जगताप यांची महाराष्ट्र शासनाने विशेष कार्यकारी अधिकारी (स्पेशल एक्सिक्युटीव ऑफिसर) पदावर नियुक्ती केली आहे.

**९) सोलापूरच्या कन्येचा राष्ट्रपती पदकाने गौरव-**

स्टेट बँक पेंशनर, श्री. ज्ञानेश्वर पंढरीनाथ कुलकर्णी यांची कन्या सौ. विद्या कुलकर्णी (चिकनगावकर) सध्या तामीळनाडू येथील चेन्नई येथे पोलिस महानिरीक्षक (आय. जी पदावर) कार्यरत आहेत. यांना पोलिस दलात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल राष्ट्रपती पदक देण्यात आले. सौ. विद्या कुलकर्णी या १९९८ बॅचच्या आय. पी. एस. अधिकारी आहेत.

**१०) श्री एम. एस. चकलाब्बी**

बँकेच्या डिस्पेंसरीसाठी आठवड्यातून ३ ही दिवस डॉक्टरसोबत हजर राहून ते मदत करतात. तसेच त्यांनी औषधाचे व लाभार्थी सभासदांचे रेकॉर्ड अत्यंत व्यवस्थित ठेवले आहे.

आमच्या पेन्शनर्सच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ज्या पेन्शनर्सनी वयाची ७५ वर्षे पूर्ण केली आहेत त्यांचा पण सत्कार करण्यात येतो. सोलापूरच्या सभेत अशा खालील ४ जणांचा सत्कार करण्यात आला. त्यांच्या कार्याची थोडक्यात माहिती येणेप्रमाणे-

**१) श्री एम. डब्लू देशपांडे-**

स्टेट बँक स्टाफ क्रेडीट सोसायटीत सभासदांची सोय व सोसायटीचे हित, हेच ध्येय मनाशी बाळगून चेअरमन म्हणून १२ वर्षे उत्तम कार्य केले. स्टेट बँक परिवारातर्फे बाळीवेस शाखेत गणेश उत्सवात सतत २८ वर्षे सक्रिय सहभाग. कंझ्युमर स्टोअर्स मध्ये सहभाग. सर्वांकडून काम करुन घेण्याचे उत्तम कसब यांचे ठिकाणी आहे.

सौ. देशपांडे यांच्या उत्तम तिळगूळ वड्या दरवर्षी 'तिळगूळ घ्या गोड बोला' म्हणून सर्वांना दिल्या जातात.

**२) श्री अंबादास कदम (ए. आर. कदम) -**

यांचा स्वभाव अत्यंत शांत व धीरगंभीर असून सर्वांना सर्व कामात मदत करण्याची वृत्ती आहे. ''समता सैनिक दल'', ''पारमिता फाऊंडेशनचे'' तसेच ''डॉ. आंबेडकर सेंटर फॉर सोशल स्टडीज'' या तिन्ही संस्थांचे ते सचिव म्हणून कार्यरत आहेत. तसेच सोलापूर विपश्यना सेंटरचे खजिनदार, एक कलावंत व अभिनेते म्हणूनही सर्वांना परिचित आहेत. तरुण तुर्क म्हातारे अर्क, डॉ. कैलास, गजाआडचे गाणे, कहाणी कोणा प्रेमिकांची, टॅक्स फ्री, या नाटकातून सहभाग. प्रसिद्ध नट श्री. विक्रम गोखले यांचे हस्ते पण त्यांचा सत्कार झाला आहे.

**३) श्री सिद्रामप्पा मुनोळी (एस. एस. मुनोळी)-**

क्रिडा व संगीत यांची आराधना एकाच वेळी करत आहेत. ते टेबल टेनिस चँपियन होते. इंडोनेशिया तसेच मलेशिया येथे टेबल टेनिस खेळासाठी निवड झाली होती. जुन्या हिंदी गाण्यांचा प्रचंड संग्रह यांचेकडे आहे. रोज नियमित टेबलटेनिस खेळतात. त्यामुळे प्रकृती उत्तम आहे.

**४) श्रीमती सरोज बी कुंभारे-**

श्री कुंभारे साहेबांच्या निधनानंतर वयाच्या ४५ व्या वर्षी स्टेट बँकेत नोकरी सुरु केली. बँकेचे काम व्यवस्थित सांभाळले व घरची जबाबदारी पण आनंदाने पूर्णत्वास नेली. मुलांचे शिक्षण, नोकरी सर्व पूर्ण केले. आता भजन तसेच श्री गजानन महाराज विजय, ज्ञानेश्वरी यांच्या सामुहिक पारायणात भाग.

मला येथे नमूद करण्यास आनंद वाटतो की सर्व सभासदांना (२५० च्या आसपास) श्री. देशपांडे व श्रीमती कुंभारे यांनी अनुक्रमे बेडशीटस् व टर्कीश टॉवेल्स् भेट म्हणून दिले. सोलापूर युनिटचे उत्तम कार्य व श्री. तम्मा. पाटील, सचिव यांचे योगदान म्हणून श्री. वसंत जाधव यांनी प्रभावित होऊन सर्वांना टर्किश नॅपकिन्स भेट म्हणून दिलेत. एवढेच नाही तर आमच्या सर्कल मॅनेजिंग

कमिटीच्या ३५ कार्यकर्त्यांना पण त्यांनी नॅपकिन्स भेट दिले. या तिन्ही दानशूरांचे कितीही कौतुक केले तरी ते कमीच होईल. याच सभेमध्ये सर्वश्री विजय रुपनर व पी. आर. जौजट या निवृत्त अधिकाऱ्यांनी संपूर्ण सर्व्हिसमध्ये एकही मेडिकल बिलाचा दावा बँकेकडे दाखल केला नाही, व त्यांनी आपल्या तब्येती उत्कृष्ट ठेवल्याबद्दल त्यांचा पण सत्कार करण्यात आला.

आमच्या संस्थेच्या संवाद मासिकात सर्वश्री शशिकांत लावणीस, दत्तात्रय बेंद्रे, अरविंद पुजारी, विजयकुमार देशपांडे ह्यांच्या उत्कृष्ट कविता, लेख इ. वेळोवेळी प्रसिद्ध झाल्या आहेत. सोलापूर युनिटला नुकतीच १६ वर्षे पूर्ण झाली. सभासद संख्या ६०० च्या वर आहे. सोलापूर युनिटचे सचिव श्री. तम्मा. पाटील हे सभासदांसाठी गेली १६ वर्षे मनापासून अत्यंत निस्पृहपणे झटत आहेत. बँकेत लागल्यापासूनच त्यांनी आपल्या निगर्वी, मनमिळावू व प्रेमळ स्वभावामुळे बँकेतील व बँकेबाहेरील बराच मोठा असा मित्रवर्ग जमा केला आहे. सर्वांशी अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध असल्याने त्यांना कोणत्याही कामात सर्वांकडून मदत मिळतेच. बँकेतील अधिकारी व कर्मचारी यांच्याशीपण अत्यंत सौहार्दाचे संबंध असल्याने पेन्शनर्स बंधू भगिनींच्या अडचणी सोडविण्यास मदत होते. कोणालाही मदत करण्यास ते स्वतः पुढाकार घेतात. सोलापूर युनिट नांवारुपास आणण्यास त्यांचा सिंहाचा वाटा आहे. संस्थेचे सभासद करण्यात तसेच आमच्या संस्थेस देणग्या मिळवून देण्यात ते महाराष्ट्र व गोव्यात नेहमीच प्रथम क्रमांकावर असतात. त्यांच्या उत्कृष्ट कामाची पावती म्हणून जुलै २०१५ च्या आमच्या संघटनेच्या नागपूर येथील वार्षिक सर्वसाधारण सभेत त्यांना कै. वा.वि. गंधे व कै. श्रीमती उमाबाई वा. गंधे (रू. ५००१/- रोख व प्रशस्तिपत्रक) पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

मागच्याच वर्षी श्री. तम्मा. पाटील यांनी पुढाकार घेऊन सर्व पेन्शनर्स सभासदांकडून वर्गणी गोळा करून एक किलो चांदी श्री. सिद्धेश्वर देवस्थानास नूतनीकरणासाठी अर्पण केली.

श्री. पाटील यांना संघटनेच्या त्यांच्या कामात सर्वश्री बेंद्रे, अंबुसे, के.एम्. शेख, शशिकांत लावणीस, बी. व्ही. कुलकर्णी, राजोपाध्ये, कोरे, बाबा कदम, हेगडे, जगताप, सुधीर देव इ. असे अनेक जण मदत करतात. युनिटतर्फे मनोरंजनात्मक कार्यक्रम, सभासदांच्या सहली, हुरडा पार्टी, मान्यवरांची व्याख्याने, बँकेची टेक्नॉलॉजी शिकण्याबद्दलचे वर्ग घेणे, संक्रातीचे हळदीकुंकू/ तिळगूळ समारंभ इ. कार्यक्रम आयोजित केले जातात.

श्री. तम्मा. पाटील व त्यांचे सर्व सहकारी करीत असलेल्या उत्कृष्ट कार्याचे कितीही कौतुक केले तरी ते कमीच पडेल. सोलापूर जिल्ह्याची विजयी पताका गौरवानी कायम फडकत राहो हीच सदिच्छा. संघटनेतर्फे सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन. सर्वांना उत्तम प्रकृती व दीर्घायुष्य लाभो हीच परमेश्वर चरणी प्रार्थना.

विलास गंधे, मुख्य सचिव

एस्.बी. आय. पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे.

९३७१२१८७७५

## युनिटवार्ता - सांगली

सांगली युनिटची वार्षिक सभा दि. ६ ऑगस्ट २०१७ रोजी सांगली येथील दांडेकर हॉल, विश्रामबाग येथे संपन्न झाली.

युनिटचे पदाधिकारी सर्वश्री एस. डी. करमरकर, आर. टी. कांबळे, सुरेश छत्रे, साठे आणि पुणे झोनल सब-सेंटरचे श्री. सी. पी. कुलकर्णी (अध्यक्ष) व श्री. चाटे यांनी उपस्थित राहून सभेस मार्गदर्शन केले व सभा उत्साहात पार पाडली. कोल्हापूर युनिटच्या कार्यकर्त्यांनी व पदाधिकाऱ्यांनीही सभेस उपस्थिती लावली.

सभेच्या यशस्वी आयोजनात सर्वश्री करमरकर, कांबळे, मेहता, पी. डी. कुलकर्णी, सी. के. कुलकर्णी, बेडेकर, ताम्हनकर, कट्टी, एस. पी. जोशी, मोहिते, घेजी, माने, अरूण करमरकर, हलमणियार, सौ. कवठेकर आणि श्रीमती इनामदार यांनी खूप मेहनत घेतली.

सचिव

## विनोदी लघुकथा

# कटकट

छोटेसे ऑटो गॅरेज चालविणारा दिनकर खाऊन पिऊन सुखी होता. पत्नी सुमन, दोन शाळकरी मुलं. दोन खोल्यांच स्वतःचं घर व थोडी शेती. तालुक्याचं गाव असल्यानं गॅरेज बऱ्यापैकी चालत होतं. गावात आणि तालुक्यात मिळून २०/२५ ट्रॅक्टर्स, अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या जिप्स, सहा सिटर रिक्षा, अनेक स्कूटर्स, मोटर सायकली होत्या. समोरच गावातला एकुलता एक पेट्रोल पंप. त्यामुळे गॅरेजच्या आधारे दिनकरचा संसार व्यवस्थित चालला होता. सायंकाळी सातच्या सुमारास दिनकरचा मोबाईल वाजला. त्याने तो घेतला, बायको सुमनचा कॉल होता. ह्या वेळी तो अपेक्षितच होता.

दिनकर - बोल.

सुमन - घरी कवा येनार?

दिनकर - अर्ध्या-एक तासाचं काम बाकी आहे.

सुमन - मी काय म्हनते?

दिनकर - अगं बोल ना मग, लांबण नको लावू.

सुमन - रात्री जेवायला काय रांधू?

दिनकर - कर तुला जमेल ते.

सुमन - असं नको, तुमी सांगा, तुमी सांगाल ते रांधते.

दिनकर - वरण, भात, भाजी पोळी कर मग.

सुमन - अव्! ते सकाळीच तर खाल्लं.

दिनकर - झुणका (पिठलं) कर तव्यावर! भाकरी बरोबरखाऊ.

सुमन - अवं! ते आपली कारटी खात नाही ना!

दिनकर - वाटाणे वाटून पातळ चटणी कर.

सुमन - अवं! ती रात्री खाल्ली तर पचायला जड जाते.

दिनकर - तुझ्या आवडीचं कर मग!

सुमन - असं काय करता? तुम्ही सांगाना, तुम्ही सांगाल ते करते ना!

दिनकर - अंडा करी कर मग!

सुमन - काही वाटतं का सांगायला? आज सोमवार आहे.

दिनकर - अरे हो! विसरलोच होतो! धिरडं कर मग!

सुमन - अवं! त्याचा भारी कुटाणा असतो. सर्व तयारी आधीच करून ठेवावी लागते.

दिनकर - तुरीच्या वल्या शेंगा उकळून टाक मग

सुमन - अरे देवा! आज शेतात शेंगा तोडायला वेळच मिळाला नाही.

दिनकर - दोन मॅगी पॅकेट उकळून टाक मग!

सुमन - काही बी काय? ते काय जेवण असतं का?

दिनकर - मग आता तुला काय सांगू? असं कर भरलेलं मसाला वांग कर!

सुमन - आता वांगी आणायला बाजारात जावं लागेल, उशीर होईल अन् आता बाजारात सर्व उरेलं-सुरलं भाज्या मिळतात. सकाळी सकाळीच ताजा भाजीपाला मिळतो.

दिनकर - मग आता तुला काय सांगू?

सुमन - सांगा नं तुमी! तुमी सांगाल ते रांधते.

दिनकर - असं कर आपण पाच-कंदील चौकात बाहेरच जेवायला जाऊ. हॉटेलात नाहीतर गाडीवर काहीतरी खाऊ.

सुमन - नको नको! बाहेरचं खाऊन तुमचं पोट बिघडतं आणि मग मुलंही भेळ-पाणीपुरी काही काही मागतात. अन् वरतून पुन्हा पांडेची कुल्फी. आजारी पडायची लक्षणं! दुसऱ्या दिवशी मग शाळा बुडवतात.

दिनकर - मग मुलांना आवडेल ते घरीच कर!

सुमन - आपली कारटी भलतीच लाडावलेली आहेत. ते खूप काही काही करायला सांगतील.

दिनकर - घरात दूध आहे का? मी येताना ब्रेड घेऊन येतो. दूध-ब्रेड खाऊ.

सुमन - काहीही काय? ब्रेड खाऊन कुठं पोट भरतं का?

दिनकर - (मनातल्या मनात)- च्यायला काय कटकट आहे? बोलत नाही.

सुमन - अहो, आवाज का येत नाही? हॅलो, हॅलो, कट झाला की काय? हॅलो हॅलो!

दिनकर - ''हे बघ तुला जमेल ते कर. मला आता दुसरं अर्जंट काम आलं आहे. मला यायला उशीर होईल. माझी वाट बघू नका, तुम्ही जेवण करुन झोपा.''आणि त्यानं मोबाईल कट केला.

त्याने हातातले मोटर-सायकलचे काम पूर्ण केले. गाडी आत लावली. गॅरेज बंद करुन कुलूप घातले व तो स्वतःची मोटर-सायकल घेऊन एस्.टी. स्टॅण्डकडे निघाला. एस्.टी. स्टॅण्ड जवळ उस्मान चाचाचे 'ताज मटण हॉटेल' होतं. तेथे दिनकरचे मधून मधून जाणे-येणे होत असे. हॉटेलात शिरताच त्याने ''सलाम चाचा, कैसे हो''?

चाचा - आओ आओ दिनकर, क्या हाल है?

दिनकर - ठीक है! चाचा, जोरकी भूक लगी है! हॉटेलातील सर्व पदार्थ संपलेले होते, तरी गिऱ्हाईकाला नेहमीच्या पद्धतीने चाचा म्हणाले ''बोल क्या खायेगा?''

दिनकर - चाचा एक प्लेट चिकन-बिर्याणी खिलाओ!

चाचा - अरे दिनकर आज सोमवार है, गिऱ्हाईक भोत कम है! तेरे एक प्लेट के लिये, अख्खी मुरगी काटनी पडेगी! और अब ९॥ बज रहे है! कोई गिऱ्हाईक भी नही आयेगा!

दिनकर - क्या चाचा! ठिक है! तो फिर एक प्लेट मटण देव और दो भाकरी बनाओ!

चाचा - माफ करना दिनकर आज म्युनिसिपालीटीमें कोई अफसर आया है, उधर पार्टी है म्युनिसीपालटी वाले सब मटण ले गये! हौर मांग रहे थे. कुछ भी बाकी नही रखा!

दिनकर - ठीक है, अंडा करी नही तो अंडा भुर्जि तो है ना?

चाचा - या खुदा! तुझे क्या बताऊ? उनके पास शराब की बोतले भी थी, दादा पवार के दुकानसे लाये थे, वो भी शेकडा! दादा किसीको उधार देता है क्या? चखने के लिये सब उबाले हुये अंडे ले गये, कच्चे भी लेके गये! कहते थे, हम उबाल लेंगे, अंडोका सारा स्टॉक खतम हो गया और
तेरेकू क्या बोलू? सालोने मेरे पैसे भी नही दिये! मांगने लगा तो बोले ''बादमें दे देंगे! कहा भाग जानेवाले है? अब मैं गरीब आदमी क्या बोलता?

दिनकर - चाचा! अब गये तुम्हारे पैसे.

चाचा - हौ न भौ! देखते है अब!

दिनकर - पर अब मै खाऊ क्या?

चाचा - क्यू आज तेरे बेगम ने कुछ पकाया नही क्या?

दिनकर - नही वैसा कुछ नही! मेराच इधर आनेका मन हुआ!

चाचा - तू ५/१० मिनीट बैठता क्या? मेरे पास शेव है, मै अभी शेव की भाजी और भाकरी बना के देता हूं!

मधल्या वेळेत सुमनचे २/३ कॉल आले होते पण ते त्याने घेतलेच नव्हते. तेवढ्यात पुन्हा कॉल आला तो त्याने घेतला.

दिनकर - बोल

सुमन - अवं कुठं आहात तुमी?

दिनकर - काय कटकट आहे गं! का विचारतीस?

सुमन - मी गॅरेजवर डबा घेऊन आले तर आपल्या गॅरेजला कुलूप. तुम्हाला काम होतं ना?

दिनकर - आता डबा का आणला? मला भूक नाही.

सुमन - आई आली आहे.

दिनकर - अगं तुझी आई १५ दिवसांपूर्वीच येऊन गेली ना?

सुमन - हो! मग काय तिनं पुन्हा येऊ नये?

दिनकर - (नरमाईने) नाही, तसं नाही पण.....

सुमन - ही ही ही SS (हसण्याचा आवाज फक्त)

दिनकर - (चिडून) आता दात काढायला काय झाले तुला?

सुमन - माझी आई नाही, तुमची आई आली आहे. ही ही ही (पुन्हा हसते) ऐकाना! आईनं आपल्या सर्वांसाठी तुमच्या आवडींच्या पुरण-पोळ्या आणल्या आहेत. पोरं घरी खाताहेत, तुम्ही उपाशी किती वेळ राहाणार? म्हणून तुमच्यासाठी डबा घेऊन आली, पण तुम्ही कुठं आहात?

दिनकर - (उस्मान चाचाला डोळा मारुन) अगं मी उस्मान चाचाच्या हॉटेलजवळ एका गिऱ्हाईकाकडे आपली उधारी घ्यायला आलो होतो, आलोच, दोन मिनिटात! तू तिथंच थांब, आपण घरीच जाऊ आणि घरीच जेवू. तू पण काही खाल्लं नसेल ना. निघालोच.

सुमन - घाई करु नका, दमानं या! दिनकर ने मोबाईल खिशात ठेवला. उस्मानचाचा गालातल्या गालात हसत होता. दिनकरने राजदूतला किक् मारली व तो सुसाट गॅरेजकडे निघाला, जाताना चाचाला म्हणाला, ''चलता हूं चाचा! घरवाली वाट देख रही है!''

चाचा - आजा फिर, फुरसतसे!

वसंत धुपकर, पुणे

मो. ८९७५२१८०४९

४१/१७

आधार - व्हॉट्सॲप वरील एक छोटा संवाद

## अनुभव

# रुडका कलान ब्रँच

माझ्या १९८६ ते १९९० या ब्रँचेतील इन्स्पेक्शनच्या काळातल्या काही आठवणी अजून ताज्या आहेत. विशेषतः पंजाबमध्ये 'अतिरेकी' कारवाया मोठ्या प्रमाणात चालू होत्या त्यावेळचे 'अनुभव' मी कधीच विसरू शकत नाही. अशीच एक आठवण.

५ जानेवारी १९९० ला 'नोहरा' या हिमाचल प्रदेशातल्या ब्रँचचे इन्स्पेक्शन आटोपून मी 'रुडका-कलान' या जालंधर जिल्ह्यातल्या (जालंधर पासून ४० किमी दूर असलेल्या) ब्रँचला ६ जानेवारी १९९० ला पोहोचलो. गेल्यावर पहिली गोष्ट माझ्या ध्यानात आली, ती म्हणजे आपल्या असो.चे माजी अध्यक्ष कै.एन.एस. कुलकर्णीसाहेब 'चंडीगड सर्कल'मध्ये 'डी.जी.एम.' असताना त्यांच्या हस्ते ह्या ब्रँचचे उद्घाटन झाले होते. तसा उल्लेख असलेला पितळी बोर्ड (Plaque) बँकेच्या प्रवेशद्वाराबाहेरील भिंतीवर बसवला आहे.

ब्रँच तशी मोठी आहे. 'जयपूर झोनल इन्स्पेक्शन ऑफिस'ने 'इन्स्पेक्शन'साठी १५ दिवस दिले होते. ब्रँचमध्ये 'जी.एस.थापर' नावाचे शाखाधिकारी होते. नेहमीच्या माझ्या कामाच्या पद्धतीप्रमाणे, रोज सकाळी ब्रँचला गेल्यावर शाखाधिकार्यांच्या केबिनमध्ये बसून हेड ऑफिस/झोनल ऑफिसहून आलेले 'टपाल' मी प्रथम बघत असे आणि बाकी आलेले 'टपाल' शाखाधिकारी हेड क्लार्ककडे देत असे. माझी इन्स्पेक्शन संपत आली होती. शेवटच्या दिवशी सकाळी असेच 'टपाल' बघत असता हेड क्लार्क आणि एक क्लार्क घाबऱ्या-घाबऱ्याने केबीनमध्ये आले आणि ब्रँच मॅनेजरच्या हातात एक अंतरदेशीय पत्र दिले. ते पत्र केबीन मध्ये आलेल्या त्या क्लार्कच्या नावाने आले होते. ब्रँच मॅनेजरने ते वाचल्यावर त्यांचा चेहरा उतरलेला पाहिला, ते बाहेर जाऊन हेड क्लार्कशी काहीतरी बोलून आत आले. आत केबीन मध्ये आल्यावर ते जरा चिंतेतच दिसले. मी विचारले, काय झाले?

त्यांनी माझ्या हातात ते अंतरदेशीय पत्र ठेवले. पण ते 'पंजाबी' भाषेत असल्याने मी म्हटले, ''मला पंजाबी येत नाही, तुम्हीच वाचून सांगा.''

ते म्हणाले, 'हे पत्र 'अतिरेक्यांकडून' आले आहे. त्यात त्यांनी त्या क्लार्कला धमकी दिली आहे की, ''चार दिवसांनी 'एका विशिष्ट जागी' रात्री आठ वाजता रु.२५,०००/- घेऊन आमच्या (म्हणजे अतिरेक्यांच्या) माणसाला दे. हे पैसे आम्ही 'कर्ज' म्हणून मागतोय. ते तुला एक महिन्यानी परत करू. आम्ही 'शब्दाचे' पक्के आहोत पण जर तू आमची मागणी पुरी केली नाहीस आणि पोलिसांना सांगितले तर त्याचे परिणाम वाईट होतील. तुझा लहान मुलगा रोज शाळेत कोणत्या मार्गाने जातो हे आम्हाला माहित आहे, त्याला आम्ही 'उचलू'. जर तसे होऊ नये असे वाटत असेल तर आम्ही सांगतो तसे पैसे आम्हाला देण्याची व्यवस्था कर. आता यापुढे दरमहा आम्ही तुमच्या बँकेतील कोणाला ना कोणाला तरी असेच पत्र पाठवून पैसे देण्याबद्दल मागणी करू. तेव्हा तयार राहा.'' तो क्लार्क प्रचंड घाबरला होता. ब्रँच मॅनेजरचीही अवस्था काही वेगळी नव्हती.

झालं, मीही पत्रातील मजकूर समजल्यावर अस्वस्थ झालो. ब्रँच मॅनेजरला उसनं अवसान आणून मी धीर देत म्हटलं, 'लगेच झोनल ऑफिसला फोन लावा आणि रिजनल मॅनेजरला परिस्थिती कळवून डी.एस.पी. (जिल्हा पोलीस अधीक्षक) यांच्या ऑफिसकडून ब्रँचला स्पेशल प्रोटेक्शन मागवून घ्या.' त्याने फोन लावला. पण काय करायचे हे कोणी त्याला सांगेना.

मग मी ब्रँच मॅनेजरला सुचवले की, त्या क्लार्कला लगेच एक महिन्याच्या रजेवर पाठव. त्याप्रमाणे त्या क्लार्कला रजा मंजूर करून त्याने घरी पाठवून दिले. जाताना हे ही सांगितले की बायको-मुलाला घेऊन लगेच परगावी निघून जा. तासभर झोनल ऑफिसच्या फोनची वाट पाहून मग ब्रँच मॅनेजर म्हणाले की मी स्वतः झोनल ऑफिसला जाऊन सगळी परिस्थिती समजावतो आणि ब्रँच सुरक्षेविषयी त्वरित कारवाई करायला सांगतो. माझा इन्स्पेक्शनचा शेवटचा दिवस असल्याने आणि दुसऱ्या दिवशी सकाळचे माझे 'पश्चिम एक्स्प्रेस'चे मुंबई ट्रेनचे रिझर्वेशन असल्याने मला ब्रँच सोडणे भाग होते. म्हणून ब्रँच मॅनेजर रिजनल ऑफिसला जाण्यापूर्वी, त्याला माझा इन्स्पेक्शन रिपोर्ट त्या दिवशी संध्याकाळी तयार झाल्यावर, जर तो परत वेळेवर येऊ शकला नाही तर, Accountant कडे देईन असे सांगितले. ब्रँच मॅनेजर संध्याकाळपर्यंत न आल्याने 'इन्स्पेक्शन रिपोर्ट' Accountant कडे सोपवला आणि ठरल्याप्रमाणे मी दुसरे दिवशी सकाळीच 'रुडका कला' सोडलं आणि मुंबईकडे प्रस्थान ठेवले.

मला खरं तर उत्सुकता आणि भीतीपण होती की त्या 'धमकीचे' पुढे काय झाले? पण मी रजेवरुन परत आल्यावर मला हिमाचल प्रदेशमधील 'औटी' या पुढच्या ब्रँचला इन्स्पेक्शनसाठी 'झोनल इन्स्पेक्शन ऑफिसने' जायला सांगितल्याने, मला कळले नाही की 'रुडका कलान' ब्रँचला पुढे काय झाले ते. पण 'त्या' काळात पंजाबातील ब्रँचेसची परिस्थिती फार बिकट होती. केव्हाही, कुणालाही अशा धमक्या येत असत. एका दुसऱ्या बँकेच्या ब्रंच मॅनेजरला तर अतिरेक्यांनी चक्क पळवून नेले होते आणि त्याच्या सुटकेच्या बदल्यात काही लाखाची 'खंडणी' मागत होते आणि ब्रँच मॅनेजरला सोडवण्यासाठी बँकेने तीन दिवस 'पैशाची' ब्रीफ केस घेऊन आपली माणसे 'अतिरेकी' सांगतील तिथे पाठवत होते पण पुढे त्या ब्रँच मॅनेजरला अतिरेक्यांनी सोडले की नाही हे कळले नाही. खरोखर, त्या काळात पंजाबातील ब्रँचेसमध्ये काम करणे कठीण झाले होते. झोनल इन्स्पेक्शन ऑफिसच्या सक्त ऑर्डर्स होत्या- ''जशी स्थानिक परिस्थिती असेल तशी इन्स्पेक्शन करा. फिल्ड इन्स्पेक्शन्स नाही झाल्या तरी चालतील पण आपला जीव धोक्यात घालायचा नाही.'' अमृतसरमध्ये तर संध्याकाळी सहा वाजले की पोलिस येऊन ब्रँच लगेच बंद करायला सांगत असत कारण साडेसहा नंतर कुणाला रस्त्यावर फिरकू देत नसत. अमृतसरमधील दुसऱ्या एका ब्रँचचे इन्स्पेक्शनसाठी जात असताना दिवसा रस्त्यावरच दोन वेळा माझी पोलिसांनी पूर्ण 'झडती' घेतलेली आठवतेय. अशा तंग वातावरणात इन्स्पेक्शनचे काम पार पाडावे लागत असे. ते दिवस आठवले की अजूनही अंगावर काटा येतो.

रामचंद्र ना. लालिंगकर, पुणे
मो. ९८२२१०७९८८

४०
१७

लघुकथा

# उंबरठा

''म्हणता म्हणता नवीन जागेत कायमचं राहायला जायचा दिवस जवळ आला''... निर्मलाबाई. हो ना! मधला काळ किती पटकन् गेला. वसंतरावांनी निर्मलाबाईंना दुजोरा दिला.

''खरं तर मधल्या काळाची आपल्याला जाणीवच झाली नाही. कारण अविनाशनं नवीन जागेत सोयी-सुविधा करून घेण्याची तयारी कधीच सुरू केली होती.''

''निर्मला, कशी वाटली तुला नवीन घराची सजावट?''

''छान आहे.'' - निर्मलाबाई गुळमुळीतपणे उत्तरल्याने म्हणाल्या - ''अनितानं आवडीनं सजवलाय तो फ्लॅट!'

''नाराज दिसतेयस का गं? तुझ्या सूचनांना तिथं वाव नाही म्हणून की काय?'' वसंतरावांनी निर्मलाबाईंच्या मनातले विचार अचूक ओळखले.

''हंऽऽ! आपल्या सूचना कशा काय विचारात घेतल्या जाणार हो तिथं? ते घर त्यांचं.... खरं तर सुनेचंच निर्मलाबाई सुस्कारा टाकीत म्हणाल्या ...''नवीन घर सजवायची हौस असते बायकांना....''

''मी तुला हे सुख कधी देऊ शकलो नाही निर्मला''. वसंतराव खिन्नपणे म्हणाले - ''पूर्वी वाटायचं की कधीतरी आपण आपल्या मालकीच्या जागेत राहायला जाऊ, ती जागा मनासारखी सजवू, तुला तुझी सगळी हौसमौज तिथं पुरवता येईल... पण... हे कधी जमलंच नाही गं... मनातल्या इच्छा रुजल्या, फोफावल्या अन् कालांतरानं परिस्थितीचं खतपाणी न मिळाल्यानं सुकूनही गेल्या...''

''अगदी माझ्या मनातलंच बोललात''... निर्मलाबाईंच्या मनात आलं... आपल्यालाही पुष्कळदा वाटायचं की, घराला झुळझुळीत पडदे हवेत, घरात येणारा वारा, सुंदर उजेड, त्या पडद्यांशी खेळत घरात यावा, सगळीकडे नव्या वस्तूंचा चकचकाट असावा, स्वयंपाकघरात मला हव्या त्या सोयी मी एखाद्या राजाच्या राणीनं गाजवावा तशा अधिकारात करून घ्याव्यात आणि फक्त माझंच राज्य असावं हवं ते करता यावं... पण... छे! तसं कधी घडलंच नाही... माझ्या मनातली स्वप्नं फक्त स्वप्नच राहिली...

निर्मलाबाईंच्या मनातल्या विचारांचा जणू पडसाद उमटावा तसे वसंतराव म्हणाले ...''तुझी स्वप्नंही फक्त स्वप्नंच राहिली असतील नं निर्मला? पण तू कधीही स्वप्नंही सांगितली नाहीस किंवा ती पुरी न झाल्याबद्दल थयथयाटसुद्धा केला नाहीस. खरं तर तू माझ्यावर रागवायला हवं पण कधी रागावलीही नाहीस...''

''कशाला रागवायचं? अहो, आपली परिस्थिती कळत नव्हती का मला? तुमच्या हातात असतं तर तुम्ही मला राणीचा छोटा का होईना पण राजवाडा दिलाच असता ह्याची मला खात्री होती. तेव्हाही होती आणि आताही आहे. खरं तर आपली जागा विकून तुम्हीच अविनाशला ह्या फ्लॅटसाठी पैसे दिलेत ना? म्हणजे आता तो राजवाडा तुम्हीच मला दिलात.''

''मी खरंच खूप नशीबवान आहे. तुझ्यासारखी समजूतदार बायको मला मिळाली हे माझं खरंच खूप मोठं भाग्य आहे. पण त्या राजवाड्याची सम्राज्ञी वेगळीच आहे गं.''

''अं हं! मी राजमाता आहे. आपला अविनाश प्रेमळ आहे. आपल्याला तो कधी अंतर तर देणारच नाही, उलट आपली खूप बडदास्त ठेवेल, काळजी घेईल ह्याची खात्री आहे मला...''

''आणि मी?'' एवढा वेळ बाहेर त्यांचं बोलणं ऐकत असलेल्या अनितानं खोलीत येत विचारलं...''मी तुम्हाला कशी वागवेन असं वाटतंय?''

''तू सुद्धा चांगलीच आहेस ग! म्हणून तर विश्वासानं आम्ही आम्हाला तुझ्या हाती सोपवतोय नं?'' निर्मलाबाईंनी उत्तरादाखल प्रतिप्रश्न केला. ''अग, सामान कधी हलवायचं, बांधायचं कसं नी हलवायचं कसं ते ठरवलंस का?''

''त्याची काळजी करू नका. हल्ली अशी माणसं असतात, की जी आपल्याला सामान बांधायला, हलवायला मदत करतात. पुढच्या शनिवारी-रविवारी सामान

हलवूया म्हणजे आम्हाला जास्त रजा घेण्याची गरज पडणार नाही. तेच लोक बॉक्सेस देतात. त्यातच भरू.''

''पण तिकडे ते सगळं उपसून कपाटांमध्ये लावायचं, फर्निचर लावायचं, पलंग लावायचा हे सगळं त्रासदायक ठरेल नाही?''

''अं हं! तेच लोक मदत करतील. जास्त सामान आहेच कुठं? आजच कपाटं आवरायला घ्या. जुनं सगळं भंगारवाल्याला देऊन टाका. नवीन घरात सामानाची गर्दी कशाला?''

काडी काडी जमवून उभारलंय हे संसाराचं घरटं. त्यातल्या मायेच्या कापसाची हेळसांड कशी करणार?-- निर्मलाबाईंना कोणतीही वस्तू टाकायची कल्पनाही कशीतरीच वाटली.

''तुमचे कपडे ठेवायला तिकडे स्वतंत्र वॉर्डरोब बनवलाय. ओट्याखालच्या कपाटात भांडीकुंडी राहतील. पलंग, खुर्च्या तिकडे तुमच्या खोलीत राहतील''.... अनितानं सगळंच ठरवून टाकलं होतं.

..... घराचं सोडाच पण आमच्या खोलीत काय काय ठेवायचं हे सुध्दा तिनंच ठरवलंय--- निर्मलाबाईंचं मन सुस्कारे सोडत होतं. लग्न झाल्यावर सासूसासऱ्यांच्या आवडीनुसार, सोयीनुसार घर होतं. आत्ता आत्तापर्यंत ते होते--- तोपर्यंत स्वतःच्याही काही इच्छा असतात, आवडीनिवडी असतात हेच आपण विसरुन गेलो आणि घरातली आपली गैरसोयच आपली सवय, नी पुढे तीच सर्वोत्तम सोय बनली. माणसाचं मन इतकं सवयीच्या आधीन होतं की सवय माणसाचं मन मोडून टाकते? सोय-गैरसोय हे फक्त मनाचे चोचले की मनाच्या चोचल्यांना गरजेनुसार नी परिस्थितीनुसार सोय किंवा गैरसोय म्हणण्याची सवय होते? पूर्वी सासूचा संसार आपला संसार मानला- आता सुनेचा संसार आपला मानायचा.

सासूबाई म्हणायच्या- ''इतकी वर्ष संसार केलास पण प्रत्येक गोष्ट मलाच बघावी लागते..''

म्हणजे...? तो संसार माझा होता? .... खरंच? फक्त म्हणायला माझा संसार. संसार म्हणजे तरी नेमकं काय? सासू, सासरे, नवरा, मुलगा? की घर आणि घरकाम? की घरांतलं सामान? की ह्या सगळ्यांशी निगडीत आपल्या आवडी-निवडी, आशा-आकांक्षा नी अपेक्षा? नी हे धड काहीच मिळालं नाही तर फक्त उपेक्षा? आता सुनेचा संसार- तिथं मात्र सगळंच तिचं- घर, सामान, आशा, आकांक्षा, अपेक्षा, स्वप्नं, नवरा, मुलगा--नी सासूसासरे सुध्दां तिचेच- म्हणजे तिच्याच तालावर हलणारे, डोलणारे नी नाचणारे सुध्दा--- निर्मलाताईंचं मन आज इतक्या वर्षांनी एकदम निराश, वैफल्यग्रस्त झालं. सगळयाच गोष्टींमधला, विचारांमधला, नव्या जागेत राहण्याच्या कल्पनेमधला उरलासुरला उत्साह संपला---

त्या भानावर आल्या तेव्हा अनिता विचारीत होती- ''आई, किती वाजता निघायचं? जेवणाचं काय करायचं? टेम्पो किती वाजता मागवू?---''

''मला गं त्यातलं काय कळतंय? तुम्हाला ठीक वाटेल तसं करा''-- निर्मलाबाईंच्या आवाजातला निरुत्साह अनिता नी वसंतराव दोघांनाही प्रकर्षानं जाणवला.

वसंतराव म्हणाले- ''अगं, निघण्याआधी चार दिवस सगळ्यांनी बुक केलेत्. सकाळचा चहा, दुपारचा चहा नाश्ता, निघण्याच्या दिवशी करायचा नाही ही सक्त ताकीदही दिलीय.''

''खरंच! ह्या सगळया शेजाऱ्यांचं प्रेम, सहवास सोडून जाताना खूप जड जाणार आहे हं आपल्याला.''

''अगं, काही मिळविण्यासाठी काही गमवावंच लागतं- हा निसर्गनियमच आहे. दिवस संपतो तो रात्रीची चाहूल देऊन आणि दिवस उजाडतो तेव्हा रात्र जाते संपून...'' वसंतराव म्हणाले.

आत्ताही अचानक अनिताला ते सगळं आठवलं आत्ताही नवीन जागेतच रहायला जायचं होतं... उन्मेषच्या म्हणजे त्यांच्या मुलाच्या घरी राहायला जायचं होतं.

अनिता अविनाशला म्हणाली-''आईबाबांना बिचाऱ्यांना कधीच त्यांच्या आवडीनिवडी पुऱ्या करता आल्या नाहीत. आईंना विचारलं तरी म्हणायच्या- ''तुला योग्य वाटेल ते कर.''

''खरंच गं! बाबासुध्दा कोणत्याही बाबतीत स्वतःचं मत सांगत नसत. अनिता, त्यांना इकडे आणून

आपण चूक नाही ना केली?''- अविनाशच्या मनात त्या क्षणी थोडी कालवाकालव झाली.

''आपण त्यांना त्यांच्या उतारवयात सोडून द्यायला हवं होतं का? आपणही आता उन्मेषच्या घरी राहाणार आहोत. थोड्याफार फरकानं आपलीही तीच परिस्थिती आहे. तेव्हां आईबाबांचं मन आपल्याला कळलंच नव्हतं. पण परिस्थितीच तशी होती की त्यांना आपण एकटे सोडून येऊ शकत नव्हतो.'' ''आत्तासुद्धा परिस्थितीचीच मागणी आहे अनिता. आपण आपल्या मुलाकडे राहायला जाणार आहोत''- अविनाशने खरी वस्तूस्थितीच मांडली.

''खरंच! मुलाचा उत्कर्ष नी पालकांचं वृध्दत्व कधीच नीटपणे हातात हात घालून नांदू शकत नाही. सर्वच एकमेकांना सांभाळण्याचा प्रयत्न करतात. पण तरीही 'आहे मनोहर तरी गमते उदास' ही ओळ प्रत्येकाच्या आयुष्यात कोणत्यातरी टप्प्यावर प्रत्यक्षात अवतरतेच!''- अनिता उद्गारली.

''आत्ता आपण मुलाचंही मन ओळखतोय नी आईबाबांचंही मन आठवतोय. पण मुलाला आपलं मन आत्ता कळणारच नाही. प्रत्येकाच्या विचारांचा मनोरा आयुष्याच्या वेगवेगळया टप्प्यांवर वेगवेगळ्या रीतीचं रंगरुप घेऊन उभा राहत असतो. आपण इकडेच राहिलो नी मुलांना नव्या जागेत जा म्हणालो तर ती दुखावली जातील. आपण दोघं तसे बरीच वर्षं आपल्या मर्जीनं जगलो. आतां मुलाच्या नी सुनेच्या मर्जीनं वागू... '' अविनाश

ह्या घराच्या उंबरठ्याच्या आत होता त्यांचा भूतकाळ नी उंबरठा ओलांडल्यावर दिसणार होता भविष्यकाळ---

अविनाश न् अनिता मनातल्या मनात विचार करीत बसून राहिले.

खूप वर्षांपूर्वी वसंतराव नी निर्मलाबाई बसले होते तस्सेच.

माहीत नसलेल्या भविष्यातलं माहीत नसलेल्या 'सोलो' सोसायटीचं काल्पनिक चित्र रंगवीत...

३३/१७

सौ. उज्वल ब्रम्हांडकर

## क्षण

क्षण! एकच क्षण छोटासा इवलासा
ठेवून जातो मनामनावर
जन्मभराचा ठसा।।धृ।।

एकच क्षण तो चिमटीमध्ये
मावेनासा ऐसा
स्थित्यंतर घडवितो जीवनी
माहीत नाही कसा।।१।।

चेंडूफळीचा खेळ कसा तो
येतो अतिरंगात
धावामागुनी धावा निघती
तशाच जोमात।।२।।

चौकारांचा षट्कारांचा
वर्षाव होतसे वेगात
अरेरे! क्षण एकचि येतो अन्
होतो खेळाडू झेलचित।।३।।

क्षण येई कसा तो न लगे
तयाची चाहूल
गेल्यावरी कळते दिली तयाने
आपणास हूल।।४।।


कळल्यावरही यत्न व्यर्थ
करतो त्या धरण्याचा
हाती न येई कदापि जो
निसटला एकदाचा।।५।।

गेला क्षण तो जाऊ द्यावा
खंत न असावी त्याची
स्वागत करण्यासाठी करुया
प्रतीक्षा पुढील क्षणाची।।६।।


३१/१७

सीमा चित्रे, नागपूर
मो. ९६६५०७१०९१

लघुकथा



# तो आणि ती



ही गोष्ट आहे, 'त्याची व तिची' पण वाचताना ती प्रत्येकाला आपलीशी वाटू लागणार. या कथेला दोन बाजू आहेत. दोन्ही बाजू आपोआप तुमच्यासमोर येतील.

सप्तपदीची सात पावलं, त्याच्या हातात हात देऊन, निःशंक मनाने तिने घराचा उंबरठा ओलांडला व ती त्या घरची एक होऊन गेली. भारतीय संस्कृतीचं कणा असणारं हे नातं तिने लीलया पेललं. त्याच्या नकळत तिने सर्वांना जिंकलं. ती सगळ्यांमधे इतकी मिसळून गेली की, तिला वगळून एकही पाऊल घरातल्यांचं पुढे पडेना पण याची जाणीव त्याला व्हायची होती.

आज तो रोजच्यासारखा फिरायला आला. पराकोटीची अस्वस्थता त्याच्या मनात होती. मनाची तगमग टोकाला पोहचली होती, पाय थरथरत होते. जीवनातील जीवनरस कोणीतरी काढून घ्यावा अशी त्याची अवस्था झाली होती. या महिन्याभरात सारं अघटीत घडलं होतं. सगळं सगळं अनपेक्षित होतं. काळाचं गणितच वेगळं आहे याची त्याला तीव्रतेने जाणीव झाली. जीवनचक्र नेहमी फिरत राहणार ते थांबणार नाही. त्याला गती आहे म्हणून तर जीवन आहे. हे सगळं त्याला माहित होतं पण ते आपल्याला लागू आहे हे तो जगता जगता साफ विसरून गेला. त्याचं मन क्षणभर खंतावलं. त्याच वेळी बागेतील थंडगार हवा त्याच्या अंगाला स्पर्शून गेली. त्याच्या अंगात दोन क्षण शिरशिरी निर्माण झाली. त्याने बाकाचा आधार घेतला व बाकावर स्तब्धपणे बसून राहिला. समोर बघता बघता तो निसर्गातील सौंदर्य न्याहाळायचा प्रयत्न करु लागला. तिचं कानात साठवून ठेवलेलं बोलणं क्षणभरात आठवलं. त्याच्या चेहऱ्यावर स्मितहास्य पसरलं. किती फरक होता तिच्यात व त्याच्यात पण हा फरक कधी त्याच्या लक्षात आलाच नाही.

छोट्या छोट्या गोष्टींमधे ती आनंद शोधायची. घरात पॉटमधे ठेवलेली फुलं असो की गॅलरीतील मनीप्लॅन्ट तिला त्यात सौंदर्य दिसायचं. गॅलरीतील मनीप्लॅन्ट छान फोफावला होता. त्याची मोठी मोठी पानं छान खुलुन दिसायची. तिनं एक दिवस मनीप्लॅन्टच्या हिरव्या पानावर पिवळ्या रंगाचं शेडींग त्याला दाखवलं व तो थक्क झाला. ही गोष्ट आजवर आपल्याला का दिसली नाही याचं त्याला आश्चर्य वाटलं.

एकदा फिरायला गेले असताना ती त्याला म्हणाली, ''थांब ना मला बुचाची फुलं वेचायची आहेत.''

त्याला राग आला. ती मात्र बिनधास्तपणे फुलं वेचत होती. तिने फुलांचा गुच्छ हातात घेतला आणि ती मनापासून हसली. त्याला हा चक्क वेडेपणा वाटला. घरी आल्यावर डायनिंग टेबलवर तिने बसक्या पेल्यात फुलं ठेवली आणि त्यानंतर फुलांचा मंद सुगंध घरात कितीतरी वेळ दरवळत होता.

निवृत्तीनंतर जीवनाला स्थैर्य आलं. आजकाल खूप वर्षांनी आपण तिला नव्याने ओळखतो आहे असं त्याला वाटू लागलं. पूर्वीचं सगळं जीवन धावपळीत गेलं तेव्हा सगळं सगळं हातातून निसटून गेलं की काय? हेच त्याला कळेना. त्याला क्षणभर वाटलं, आपलं चुकलंच. ऑफीस, घरची जबाबदारी यात आपण पूर्णपणे गुरफटून गेलो पण ही चूक तरी कशी म्हणावी? तरुणपण हे कष्टाचं, कर्तव्यनिष्ठतेचं व आर्थिक स्थैर्य निर्माण करण्यासाठी असतं. तेव्हा ती सतत आपल्याबरोबर होती व नव्हतीही असं का वाटतं? काहीच कळत नाही. घरातल्या छोट्या छोट्या गोष्टी तिने कधीच आपल्यासमोर येऊ दिल्या नाहीत. घरात ती साखरेसारखी विरघळून गेली पण तिला काय हवंय? हे कोणालाच कळलं नाही, आपल्याही लक्षात काहीच आलं नाही. त्याचं मन खंतावलं.

एकदा ती त्याला म्हणाली, ''मी नोकरी करु?'' ''का? तुला काही कमी आहे?'' त्याने प्रतिप्रश्न केला. ''नाही. तसं काही नाही पण शिक्षण आहे म्हणून नोकरी करावीशी वाटते.'' ती हळू आवाजात म्हणाली.

आता ते आठवून त्याला गदगदून आलं. त्याची चूकच झाली. घरात मुलांची, भाऊबहिणींची, आईवडिलांची काळजी

ती घेत होती म्हणून तर सारं सुरळीत चाललं होतं पण त्याने तिला तिचं महत्व जाणवूच दिलं नाही. तेव्हा तिला जवळ घेऊन चांगल्या शब्दात सांगितलं असतं तर तिला आनंद झाला असता. ती त्याच्या शब्दांसाठी जीव टाकायची व तो स्वतःची शब्दसंपदा जपून ठेवायचा का? का असं वागायचा तो? धाक वाटावा म्हणून, की सगळ्यांसमोर तसं वागणं चांगलं दिसायचं नाही म्हणून. त्याच्या मनात कुठेतरी अहं असायचा. एकदा तो तिला थंड हवेच्या ठिकाणी घेऊन गेला होता. तेव्हा ती त्याला म्हणाली, ''मला न, निळं आभाळ शालीसारखं पांघरावसं वाटतं आणि चांदण्याचा सडा अंगणात पडावा असं वाटतं''

त्याला हसू आवरेना. तो म्हणाला, ''वेडीच आहेस! हे कसलं स्वप्नरंजन? याचा वास्तविकतेशी काहीही संबंध नाही. मला तुझ्या या कल्पना मूर्खासारख्या वाटतात.''

आता वाटतं, किती सुंदर स्वप्न बघायची ती. तिचं एक कल्पित विश्व होतं. एक वेगळं जग होतं. त्यात तिच्या स्वप्नांना धुमारे फुटत. माणसं वाचण्याची, त्यांचं निरीक्षण करण्याची कला ती हळूहळू आत्मसात करु लागली होती, सगळ्यांच्या नकळत. 'माणसं वाईट नसतात रे, परिस्थिती वाईट असते.' ती त्याच्याशी बोलताना म्हणे तेव्हा त्याला आश्चर्य वाटत राही.

एकदा असंच काहीसं लिहून तिने लेख पाठवला. तो छापून आला आणि तिच्यावर सर्वांनी अभिनंदनाचा वर्षाव केला. ती त्या कौतुकानं गुदमरुन गेली. त्यालाही आनंद झाला. काहीतरी विशेष तिच्यात आहे याची पहिली जाणीव त्याला झाली. तेव्हापासून ती झपाटल्यासारखी पुस्तकं वाचायची. बदली झाल्यावर, प्रत्येक गावात ती वाचनालय शोधायची, पुस्तकं आणायची, वाचल्यावर त्यातलं आवडणारं टिपून ठेवायची.

रात्री झोपतांना कधी कधी ती त्याला म्हणायची, ''फारच सुंदर पुस्तक आहे. वाचशील माझ्यासाठी?''

''काय आहे त्यात?''

''तू वाच तर खरं! आवडेल तुला.''

''आता थोडी कल्पना दे. नंतर नक्की वाचीन.'' तो शब्द देऊन मोकळा होई.

कधी कधी ती मनापासून काहीतरी सांगत राही आणि तो मात्र 'हूं ऽऽ हूं ऽऽ' करत चक्क झोपेच्या स्वाधीन होत असे. ''आता तुला मी काही काही सांगणार नाही.'' ती सकाळी उठल्यावर नाराज होत म्हणत असे.

पण त्याची आवड वेगळी होती. त्याला माहितीपर पुस्तकं वाचण्याची आवड होती. याबद्दल तिला त्याचं कौतुक वाटे. इतकी रटाळ पुस्तकं, कोणत्याही विषयाची हा वाचतोच कसा? याचं तिला आश्चर्य वाटत राही.

तिला त्याच्यावर फार काळ रागावून बसणं, अबोला धरणं जमलंच नाही. ती लागलीच त्याच्याशी बोलायला येई व चटकन सॉरी सुद्धा म्हणून टाके. तिच्या या स्वभावामुळे कधी भांडण मिटवायचा प्रयत्न त्याने केलाच नाही. मग सॉरी हा शब्द तर खूप लांब होता.

तिच्यासाठी तो आवर्जून नवीन पुस्तकं आणत असे. त्यावेळी तिला खूप आनंद होई. बाहेर गेल्यावर तिने कधी साडीचा हट्ट धरला नाही. दागिने तर लांबचीच गोष्ट राहिली. पुस्तकांचं मात्र तिला अप्रुप होतं. गावाला जातानाही तिची पुस्तकं, लिखाणाचा पसारा सोबत असे पण त्यानं कधी कुरकुर केली नाही. हे तिला विशेष वाटत राही.

एक दिवस तिच्या वाढदिवसाला त्याने तिच्यासाठी फिरुन येताना सकाळी-सकाळी पाच बहरलेल्या शेवंतीच्या कुंड्या आणल्या. दार उघडल्यावर त्या कुंड्या पाहून तिच्या डोळ्यातील आनंद लपत नव्हता. तोंडावर हात ठेवून ती कितीतरी वेळ हे दृश्य डोळ्यात साठवत होती आणि मग कुंड्या कुठे छान दिसतील? कुठे ठेवायच्या यासाठी तिची धावपळ सुरु झाली.

रिटायर्ड होईपर्यंत घर हळूहळू रिकामं झालं. चिमणीपाखरं चारापाणी शोधायला लांब निघून गेली. आईवडिलांचं कृपाछत्र नाहीसं झालं. इतक्या वर्षांनी घरात ती व तो दोघंच उरलेत. व्याधींनी हळूहळू त्याला घेरलं. तो कधी कधी दुखणं मागे लागलं म्हणून हैराण होई.

''काही लक्ष देऊ नकोस त्या दुखण्याकडे. ते आपलं काम करतात आपण आपलं करावं'' ती त्याला म्हणाली. त्याला खूप राग आला.

''तुला काय होतंय असं म्हणायला? तुला असं झालं असतं म्हणजे कळलं असतं. उगाचच तत्वज्ञान सांगू

नकोस.'' तो फुत्कारला. तिला आपल्या दुखण्याबद्दल सहानुभूती नाही असं त्याला वाटू लागलं पण तसं नव्हतं. त्याच्या दुखण्याने ती कावरीबावरी होई. ती वेळेला हिंमत दाखवे पण नंतर तो बरा झाल्यावर तिला विलक्षण थकवा येई आणि दुसरी गोष्ट म्हणजे तिला स्वतःचं दुखणं सहन करायची सवय होती. ती स्वतःच्या दुखण्याबद्दल लवकर बोलत नसे. ती दुखणं अंगावर काढते म्हणून त्याला खूप राग येई.

अधूनमधून लहानसहान गोष्टींवरुन भांडणाला तोंड फुटायचं. त्या भांडणाला काही अर्थ होता ना स्वार्थ. खरं तर एकत्र कुटुंबात राहताना कधी मनासारखं भांडताही आलं नव्हतं. बहुदा त्याचाच हा परिणाम होता. भांडण झाल्यावर दोघेही चिडीचूप बसत.

एक दिवस ती त्याला म्हणाली, ''आपण आता थकत चाललोत. उरलेले दिवस खूप छान पद्धतीने घालवू. अगदी मित्रत्वाच्या नात्याने!''

''म्हणजे नवराबायकोचं नातं संपवायचं?'' त्याने धास्तावून विचारले. ''नाही रे! पण मित्र म्हणून जगून तर पाहा. आपण दोघांनीही रागवायचे नाही, चिडायचे नाही, फक्त हसायचे.'' ती म्हणाली. ''अशाने आपला संसार कसा होणार?'' त्याने गांभीर्याचा आव आणत मिस्किलपणे विचारले.

''तू म्हणजे असा आहेस.....'' ती लटक्या रागाने म्हणाली. ''हवामानाचा अंदाज व बायकोचा अंदाज येत नाही हेच खरं. कधी गडगडेल? कधी कोसळेल? कधी चिंब भिजवेल? अर्थात प्रेमाने हं. काही सांगता येत नाही.'' तो पुढे म्हणाला व दोघेही हसू लागले.

आजकाल तो सतत मरणाचं नाव काढायचा. दुखण्याने तो कावला होता. ''असं मागितल्याने मरण येत नाही. उलट आयुष्य वाढतं.'' ती म्हणाली. पण तो तिचं न ऐकता पुढचं पुढचं बोलत राहिला. स्वतःच्या इच्छा, पैशाचा हिशोब सांगत राहिला. ती निमूटपणे ऐकून घेत राहिली.

एक दिवस त्याच्या दृष्टीने वेगळाच निघाला. सगळं उलट घडत गेलं. तिचं छोटसं दुखणं विकोपाला गेलं. तो स्वतःच दुखणं विसरुन तिच्या सेवेत रुजू झाला पण हाताला यश आलं नाही. महिन्याभरात सगळं सगळं संपलं. आता तो एकाकी, एकटा झाला. रिता रिता झाला. दाटलेल्या हुंदक्यांना त्याला आवरता येईना. त्याने बागेतल्या बाकाचा दांडा गच्च धरला. ''तू गेल्यावर मला इतकं एकटं व्हावं लागेल असं कधी वाटलंच नाही. तू का आधी निघून गेलीस? तो धायमोकलून रडू लागला. त्याचं ते रुप अधिकच केविलवाणं होत गेलं.

४७/१७ सौ. माधुरी वरुडकर, नाशिक
मो. - ८२७५१३५२२१

## छाया ईश्वराची

त्या निळ्या आभाळाच्या गाभाऱ्यात
नजर नकळत माझी स्थिरावली जाते
एका अनामिक संवेदनानी हळूवार
मन माझे आनंदाने बहरुन येते ।।धृ।।

दूरदूरचे ते डोंगर माथे,
सावळ्या ढगांना चुम्बीत असती
त्या बेधुंद प्रणयाच्या पावसात
अंतरात्मा माझा सुखाने बहरुनी जातो ।।१।।

गर्द गच्च माडांच्या झावळ्यांवरुनी
चंद्राचे चांदणे नाजूक झिरपत असते
तो अबोल शांत नजारा पाहूनी,
सुखाची पालवी देहावर फूलते ।।२।।

निसर्गाच्या अनेक रुपातूनी देवा
तुझ्या स्पर्शाची मजला जाणीव होते
त्या आत्मिक सुखासाठी, वेड्यासारखा
निसर्गाच्या संगतीत, मी फिरत असतो ।।३।।

४२/१७ दिलीप रेडकर, गोरेगाव (प)
फोन : २८७३५६१३

# युरोप 2018

## प्रत्येक क्षण अविस्मरणीय बनवण्यासाठी... चला मँगो हॉलिडेज् सोबत!

Mango HOLIDAYS®

Experience of a Lifetime!






| एक्झॉटिक युरोप | ड्रीम्स ऑफ युरोप | ग्लिम्प्सेस ऑफ युरोप |
|---|---|---|
| 17 Nights/18 Days | 14 Nights/15 Days | 11 Nights/12 Days |
| Rs. 2,69,960/-* | Rs. 2,32,600/-* | Rs. 1,85,240/-* |

। परकीय चलनातील रक्कम रुपयात रूपांतरित करताना मँगो हॉलिडेजला रक्कम देण्याच्या दिवशी लागू असलेल्या एक्सचेंज रेट प्रमाणे आकारली जाईल । त्यावेळच्या लागू कन्व्हर्जन रेट प्रमाणे टूरच्या किमतीत बदल होऊ शकतात ।

### मँगो हॉलिडेज्ची एक्झॉटिक युरोप टूरच का?

- १००% प्रामाणिक किंमत, कोणतेही छुपे खर्च नाहीत आणि स्वतः संचालकांचा २५ **वर्षांचा आणि २१० युरोप टूर्सचा अनुभव.**
- उत्कृष्ट नियोजन आणि अप्रतिम टूर प्रोग्रॅम. २४ तास सोबतीस कार्यकुशल टूर मॅनेजर.
- सर्वोत्तम हॉटेल्स आणि अलिशान बसेस मधून प्रवास. अप्रतिम आणि काही हट के साईट सीईंग.
- **'स्नू प्रोटोची'** अवर्णनीय दैवी मिळाई अनुभवण्याची संधी, जशी पु.लं.नी वर्णन केली आहे, अगदी तश्शी फक्त मँगो हॉलिडेज् सोबत!
- परीकथेतल्यासारखा वाटणारा लुडविग द्वितीय यांनी बांधलेला स्थापत्यकलेचा उत्तम नमुना **'नॉयश्वानस्टाईनचा कॅसल'** म्हणजे डोळ्यांचे पारणे फिटण्याचा योग!
- समस्त ऑटोमोबाईल विश्वाचे अंतरंग उलगडून दाखवणारे **जर्मनी येथील मर्सिडीजच्या फॅक्टरीमधले अल्ट्रा मॉडर्न म्युझियम, याशिवाय युरोस्टार-मधून लंडन ते पॅरीसची सफर, डकावच्या कॉन्सन्ट्रेशन कॅम्पला भेट, माऊंट टिटलीस, युंगफ्राव, आयफेल टॉवर, लंडन आय, कोहिनूर, मादाम तुसॉचे वॅक्स म्युझियम, लिडो शो, टयुलिप गार्डन, स्वरोवस्की, व्हेनिस, पिसा, रोम, गंडोला राईड** आणि भरपूर काही जे देईल तुम्हाला मुक्ताफिरी आणि अवर्णनीय आठवणींचे समाधान!


### युरोप टूर्सबद्दल संपूर्ण माहिती जाणून घेण्यासाठी...

## आमच्या युरोप मार्गदर्शन मेळाव्याला जरूर या!

| | |
|---|---|
| पुणे | **मंगळवार, दि. ७ नोव्हेंबर २०१७, सायं. ५ ते ८**<br>यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, शिवाजी पुतळ्याजवळ, कर्वे रोड, कोथरूड, पुणे ४११०२९ |
| ठाणे | **शनिवार, दि. ११ नोव्हेंबर २०१७, सायं. ५ ते ८**<br>सहयोग मंदिर, सहयोग मंदिर पथ, नौपाडा, ठाणे (प), ठाणे ४००६०१ |
| कोल्हापूर | **शनिवार, दि. २५ नोव्हेंबर २०१७, सायं. ६ ते ९**<br>शाहू स्मारक भवन, दसरा चौक, कोल्हापूर ४१६००२ |
| नाशिक | **मंगळवार, दि. २८ नोव्हेंबर २०१७, सायं. ६ ते ९**<br>परशुराम साईखेडकर नाट्यमंदिर, नेहरू गार्डनजवळ, टिळक पथ, नाशिक ४२२००१ |
| चिंचवड | **गुरुवार, दि. ७ डिसेंबर २०१७, सायं. ५ ते ८**<br>रामकृष्ण मोरे नाट्यगृह, चिंचवड गाव, टेल्को कंपनी गेटसमोर, पुणे ४११०३३ |
| दादर | **मंगळवार, दि. १२ डिसेंबर २०१७, सायं. ७ ते १०**<br>रवींद्र नाट्यमंदिर, सिद्धिविनायक मंदिराजवळ, प्रभादेवी, मुंबई ४०००२५ |
| पुणे | **मंगळवार, दि. १६ जानेवारी २०१८, सायं. ७ ते १०**<br>मुक्तांगण हायस्कूल आवार, सर्वे नं. ४४, विद्यानगरी, पर्वती, पुणे ४११००९ |

• नियम व अटी लागू • टॅक्स लागू

**पुणे:** 302, स्वोजस कॅपिटल, फिल्म इन्स्टिट्यूट समोर, लॉ कॉलेज रोड, पुणे 411005 फोन: **(020) 2544 4415/16/17/18**
**पुणे:** रचना हाऊस, 1 ला मजला, सागर आर्केडजवळ, एफ. सी. रोड, डेक्कन जिमखाना, पुणे 411004 फोन: **(020) 25511571/2 Mob: 83800 39504**
**दादर:** 5, आदि हाऊस, नॉर्थ गोखले रोड, पोर्तुगीज चर्च जवळ, दादर (प.), मुंबई 400028 फोन: **(022) 2433 5500/11/22/33**
**ठाणे:** 702, तुलसी चेंबर्स, तीन पेट्रोल पंपाच्या समोर, एल. बी. एस. रोड, ठाणे 400602 फोन: **(022) 2545 0017/18**
| Email: info@mangoholidays.in | Website: **www.mangoholidays.in** | Follow Us:


SBI
कार लोन
उंचवा तुमचं जीवनमान!
कार
लोन
• कमी व्याज दर
• प्रोसेसिंग फी माफ
• मुदतपूर्व परतफेडीसाठी दंड नाही
नियम व अटी लागू.
अधिक माहितीसाठी https://bank.sbi वर लॉग ऑन करा किंवा आमच्या शाखेला भेट द्या
कॉल करा 1800 425 3800 / 1800 112 211 (टोल फ्री) / 080 26599990 / आम्हाला येथे फॉलो करा



Shri. Sahebrao Desai being felicitated at the hands of Shri. U.S. Kolhe, AGM (RBO-1), Aurangabad Z.O.



Shri. Subhash Agarkar being awarded with 'Late Shri. Vasudev Gandhe & Late Smt. Umabai Gandhe Award'



Shri. Somnath Dixit being awarded with 'Late Shri. Vasudev Gandhe & Late Smt. Umabai Gandhe Award'



'Late Shri. L.N. Pabalkar Gold Medal' (2017) awarded to Late Shri. P.M. Narkar being handed over to Shri. Dias



Shri. D.A. Kulkarni, Circle Treasurer, presenting the Financial Statements as on 31-03-2017 for approval



Shri. Tamma Patil (Solapur) being felicitated by Circle President Shri. S.B. Gokhale



Shri. Bhaskar Deshpande (A'nagar) being felicitated by Circle President Shri. S.B. Gokhale



Shri. P.R.Gupchup conducting the programme of felicitation of winners of competition held by Editorial Board of 'Samvad'

27

OCTOBER 2017 SAMVAD

Regd. under RNI No. MAHBIL/2008/25425 & Declaration No. PHM/SR/63/VIII/2008 Dated 12/5/2008
SSPO's (W) Dn: Pune under Postal Concession Register No. PCW/151/2017-2019
Licence to Post without Prepayment No. WPP - 22/2017-19 at Market Yard P.S.O.
Published on 25-10-2017 and Posted on 25-10-2017



Smt. Madhuri Waikar, 2nd prize winner (Ladies) of competition conducted by 'Samvad' being felicitated by Shri. S.B. Gokhale



Smt. Nilima Kharangate, 3rd prize winner (Ladies) of competition conducted by 'Samvad' being felicitated by Shri. S.B. Gokhale



Smt. Puranik, CM (HR), A'bad Z.O. addressing Pensioners' Meet



Section of the Audiance

सूचना : १) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातीतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वत: पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा 'संवाद' चे संपादक मंडळ जबाबदार असणार नाही. २) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ६ ते ७.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी. संपर्क दूरध्वनी क्रमांक : (०२०) २४३३२१४१

**Thane Office Address** : A/5, Swami Siddharth C.H.S. Ltd., S. V. Road, Naupada, Thane 400 602. **Tel. No** : 022-25446837
**Timings** : On Tuesday & Friday between 4 pm and 6 pm.

**Printed Matter**

| | |
|---|---|
| ***If Undelivered Please Return to :***<br>**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**<br>**Anubandh, Building No. B-2, 4th Floor, Block No.16, Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune 411030.Ph:020-24332141** | **To,** |

**Publisher** – Shri. Vilas Vasudeo Gandhe, Secretary, State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune has printed this magazine in the Printing Press owned by **Printer** – Shri. Shailendra Borkar, Director : Sanwad Tradeprints Pvt. Ltd., B/7, Gowaikar Building, 595, Shaniwar Peth, Pune 411030 on behalf of **Owner** – State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle), Pune, published at "Anubandh", Bldg. No. B2, Block No.16, Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune – 411030. **Editor** – Shri. Krantisen Ramchandra Athawale – address as above.